सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

वर्ष - ३ रे अंक - २६१ वा अमरावती (महाराष्ट्र) मंगळवार दि. १८ नोव्हेंबर २०२५ संपादक - डॉ. शुभांगी जोशी मुल्य - १ रु. पृष्ठ -६

# शिवसेनेचा मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार

## भाजपवर मित्रपक्षांचे पदाधिकारी फोडण्याचा आरोप; फडणवीसांनी शिंदेंच्या मंत्र्यांना झापले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकारने आज बृहन्मुंबई उपनगरातील २० एकर किंवा त्याहून अधिक क्षेत्रफळावरील म्हाडाच्या गृहनिर्माण प्रकल्पांचा पुनर्विकास करण्यासंबंधीचे धोरण निश्चित केले. सरकारच्या या निर्णयामुळे मुंबई व उपनगरांत मोठ्या प्रमाणात परवडणारी घरे उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सरकारने आजच्या बैठकीत आयकॉनिक शहर विकासासाठी धोरणही जाहीर केले आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेच्या मंत्र्यांनी आजच्या मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार टाकला. भाजपवर मित्रपक्षांचे पदाधिकारी फोडण्याचा आरोप करत शिवसेनेने ही भूमिका घेतली. त्यामुळे ऐन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर राज्याचे राजकारण तापले आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आज राज्य मंत्रिमंडळाची साप्ताहिक बैठक झाली. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची आचारसंहिता लागू असल्यामुळे या बैठकीत जनमतावर प्रभाव टाकणारे कोणतेही मोठे निर्णय घेण्यात आले नाही. केवळ निवडक विभागांचे ६ निवडक विषय या बैठकीद्वारे हातावेगळे करण्यात आले. यात सरकारने बृहन्मुंबई उपनगरातील वीस एकर किंवा त्यापेक्षा अधिक क्षेत्रफळावरील म्हाडाच्या गृहनिर्माण प्रकल्पांचा पुनर्विकास करण्याबाबतचे धोरण निश्चित. यातून मुंबई शहर व उपनगर क्षेत्रामध्ये नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणात परवडणारी घरे उपलब्ध होणार आहेत.

**शिवसेनेच्या मंत्र्यांचा बैठकीवर बहिष्कार?**

राज्यात सध्या नगरपरिषद व नगरपंचायत निडवणुकीची रणधुमाळी सुरू आहे. त्यात स्थानिक पातळीवर वेगवेगळे राजकीय समीकरणे अस्तित्वात येत आहेत. त्यातच भाजपकडून मित्रपक्षांचे पदाधिकारी पळवण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. त्यावरून सत्ताधारी महायुतीच्या गोटात प्रचंड धुसफूस सुरू झाली आहे. या प्रकरणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेना प्रचंड नाराज झाली आहे. या नाराजीतूनच शिवसेनेच्या मंत्र्यांनी आजच्या मंत्रिमंडळ बैठकीवर कथितपणे बहिष्कार टाकला.

आजच्या प्री-कॅबिनेटला शिवसेनेचे सर्व मंत्री उपस्थित होते. पण त्यानंतर झालेल्या कॅबिनेटला एकनाथ शिंदे वगळता शिवसेनेचा एकही मंत्री पोहोचला नाही. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर या सर्व नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दालनात जाऊन त्यांची भेट घेतली. त्यात त्यांनी भाजपकडून मित्रपक्षांचे पदाधिकारी फोडण्यात येत असल्याच्या प्रकारावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

**फडणवीसांनी शिंदेंच्या मंत्र्यांना झापले**

शिंदे गटाचे मंत्री भेटीस आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शांतपणे त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. यावेळी उभय नेत्यांत काय चर्चा झाली याचा तपशील समोर आला नाही. पण यावेळी मुख्यमंत्र्यांनी शिंदे गटाच्या मंत्र्यांना मित्रपक्षांचे पदाधिकारी पळवण्याच्या मुद्यावरून चांगलेच झापल्याचा दावा सूत्रांनी केला आहे.

तुम्ही उल्हासनगरमध्ये या प्रकाराची सुरुवात केली. तुम्ही जे केले ते आम्ही चालवून घ्यायचे आणि भाजपने केले तर ते चालणार नाही असे अजिबात चालणार नाही, असे ते म्हणाल्याचे सांगण्यात येत आहे. यापुढे एकमेकांचे नेते, पदाधिकाऱ्यांना प्रवेश देऊ नका. दोन्ही पक्षांनी या प्रकरणी पथ्य पाळावीत. तुम्ही पथ्य पाळणार असाल तर भाजपही पथ्य पाळेल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी त्यांना सुनावले. या प्रकाराची आज दिवसभर मंत्रालय परिसरात चर्चा सुरू होती.

## ऐन निवडणुकीत फडणवीस सरकारच्या मोठ्या घोषणा, मंत्रिमंडळ बैठकीत महत्वाचे निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीदरम्यान फडणवीस सरकारने मोठ्या घोषणा केल्या आहेत. आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये ६ मोठे निर्णय घेण्यात आले. नगर विकास विभाग, गृहनिर्माण विभाग, मदत व पुनर्वसन विभाग, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महिला व बालकल्याण विभाग आणि विधि व न्याय विभागांतर्गत हे निर्णय घेण्यात आले आहेत. .

**नगर विकास विभाग –** राज्यातील सिडकोसह, विविध प्राधिकरणांकडील जमिनी, भुखंडाचा सुयोग्य वापर निश्चित करण्यास प्राधान्य. संकल्पना आधारित आयकॉनिक शहर विकासासाठी धोरण जाहीर. सिडकोसह, अन्य प्राधिकरणांना संबंधित संकल्पनांवर आधारित एकात्मिक वसाहती निर्माण करण्याकरिता अधिकार मिळणार. निवासी एकात्मिक वसाहत किंवा आंतरराष्ट्रीय व्यावसायिक क्षेत्रांची उभारणी होणार. सिडकोसह, विविध प्राधिकरणांकडील लँड बँकेचा सुयोग्य वापर व्हावा यासाठी धोरण

**गृहनिर्माण विभाग –** बृहन्मुंबई उपनगरातील वीस एकर किंवा त्यापेक्षा अधिक क्षेत्रफळावरील म्हाडाच्या गृहनिर्माण प्रकल्पांचा पुनर्विकास करण्याबाबतचे धोरण निश्चित. यातून मुंबई शहर व उपनगर क्षेत्रामध्ये नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणात परवडणारी घरे उपलब्ध होणार आहे.

**मदत व पुनर्वसन विभाग–** भूसंपादन, पुनर्वसन, पुनर्स्थापनेची प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी नवीन पदांची निर्मिती. यामुळे भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम ६४ अन्वये दाखल असलेल्या प्रलंबित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा होणार आहे.

# सुरक्षा दलाचे सर्वांत मोठे यश

## ५०० जवानांचा बळी घेणारा जहाल नक्षल कमांडर 'हिडमा'चा खात्मा ; १० कोटींचे होते इनाम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८गडचिरोली**

छत्तीसगड, आंध्रप्रदेश, तेलंगणा व महाराष्ट्र सीमेवरील दंडकारण्यात गेल्या अनेक वर्षांपासून 'लाल दहशत' निर्माण करणारा जहाल नक्षल कमांडर हिडमा माडवी याचा खात्मा करण्यात सुरक्षा दलाला यश आले. छत्तीसगड-आंध्रप्रदेश सीमेवरील चकमकीत १८ नोव्हेंबररोजी पहाटे सुरक्षा दलाने सहा माओवाद्यांना कंठस्नान घातले. यात हिडमा माडवी याचा समावेश आहे.



हिडमा माडवी याच्यावर ५०० हून अधिक सुरक्षा जवानांना ठार केल्याचा आरोप आहे. त्याच्या शीरावर पोलिस यंत्रणेने १० कोटींहून अधिक रुपयांचे इनाम ठेवले होते. हिडमा हा अत्यंत आक्रमक माओवादी होता, तो नेतृत्व करीत असलेल्या बटालियन क्र. १ मध्ये १८०० हून अधिक सदस्य सदस्य आहेत. ते सर्व सदस्य युद्धनीतित निपुण असून, त्यांच्याकडे अत्याधुनिक शस्त्रेदेखील आहेत.

त्याचा खात्मा केल्याने सुरक्षा दलाचे हे सर्वांत मोठे यश मानले जात आहे. दरम्यान, १८ नोव्हेंबरला रोजी पहाटे छत्तीसगड- आंध्रप्रदेश सीमेवर माओवादविरोधी अभियान राबविले जात होते, यावेळी माओवाद्यांनी जवानांच्या दिशेने गोळीबार केला. प्रत्युत्तरात जवानांनी आक्रमक व सुरक्षितपणे माओवाद्यांचा डाव उधळून लावत हिडमा माडवीसह सहा जणांना ठार केले.

**१७ व्या वर्षी उचलले शस्त्र**

पोलिस सूत्रांनुसार, माओवादी हिडमा याने १९९६-९७ मध्ये दक्षिण बस्तर भागातील सुकमा जिल्ह्यातील पुवर्ती येथे त्याचे मूळ गाव. हिदमाल्लू आणि संतोष या दोन नावांनीही त्याची चळवळीत ओळख होती. त्याचे शिक्षण जेमतेत सातवीपर्यंत झाले होते, पण त्यास हिंदी, इंग्रजी भाषा अवगत होती. २००० साली त्याला शास्त्र बनविण्यात प्रशिक्षण देण्यात आले होते. २००१ ते २००७ पर्यंत तो सामान्य सदस्य होता. बस्तरमधील सडवा जुलूम मोहिमेनंतर तो अधिक आक्रमक झाला. २००७ साली बस्तरच्या उरपल मेट्टा चकमकीत २४ जवान शहीद झाले होते. या हल्ल्याचे नेतृत्व त्यानेच केले होते. त्याला बक्षीस म्हणून २००८ ते २००९ मध्ये माओवाद्यांच्या पहिल्या बटालियनचा कमांडर करण्यात आले.२०१० मध्ये ताडमेटला चकमकीत ७६ जवान शहीद झाले होते, यातही हिडमाने प्रमुख भूमिका बजावली होती.


**करेगुट्टा पहाडीवर घेतला होता आश्रय**

छत्तीसगडच्या करेगुट्टाच्या पहाडीवर माडवी हिडमा याने जून मध्ये आश्रय घेतला होता. तळपत्या उन्हात पोलिसांनी करेगुट्टा पहाडीला वेढा टाकून मोहीम राबवली होती, पण तो जवानांना हुलकावणी देत निसटला होता. मात्र, अखेर १८ नोव्हेंबर रोजी चकमकीत त्याचा खात्मा करण्यात आला.

# 'हिंदुत्वा'वरून प्रकाश महाजन यांचा ठाकरे बंधूंवर घणाघात; राजकारणात भूमिका बदलल्या पाहिजेत, पण..

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ धाराशिव**

मी सामान्य हिंदू माणूस आहे. बाळासाहेबांचे हिंदुत्व आणि त्याचा वारसा राज ठाकरेंनी चालवावा ही माझी २००८ पासूनची मागणी आहे. परंतु त्यांनी अंगावरची हिंदुत्वाची शाल का काढून टाकली माहिती नाही. तुम्ही तुमचा मूळ बेस विसरला तर स्पेसमध्ये किती दिवस राहणार? मी महाराष्ट्रात राहतो, मराठी म्हणून मला अभिमान आहे परंतु मी हिंदू विचार केला तर इतर प्रांतात राहणारे, इतर भाषा बोलणारेही हिंदू आहेत ही भावना जोपासली पाहिजे. हिंदुत्वाच्या बाबतीत दृष्टीकोन वाढवला पाहिजे असं मला वाटत होते असं सांगत प्रकाश महाजन यांनी मनसे



अध्यक्ष राज ठाकरे यांच्या भूमिकेवर टीका केली आहे.

प्रकाश महाजन म्हणाले की, हिंदुत्वात काही गोष्टी कमी आहेत, त्या सुधारल्या पाहिजे. हिंदू सनातनी धर्म असा आहे ज्यात वेळोवेळी सुधारणा होत गेली. मी स्वत: कुंभ मेळ्यात जाऊन आंघोळ केली, मला काहीही त्रास झाला नाही. मन शुद्ध असेल तर प्रत्येक गोष्ट शुद्ध दिसते. ५० कोटी लोक फक्त भारतातले नाही तर परदेशातीलही होते, ते महाकुंभला आले होते. गंगा शुद्ध झाली पाहिजे तर होय झाली पाहिजे. नरेंद्र मोदी आल्यापासून जगाचा हिंदुत्वाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला आहे. काशी विश्वेवर आज बदलले आहे. लोकांमध्ये धार्मिक भावना वाढली आहे असं त्यांनी सांगितले.

तसेच बीडमधील महिला मुस्लीम बोलते, रामायण दाखवण्यापेक्षा संविधान दाखवा, हे बाळासाहेब ठाकरेंचा सुपुत्र तिथे बसून ऐकतो. त्यापेक्षा एकनाथ शिंदे काय वाईट आहेत? ते हिंदुत्वाचा वारसा घेऊन पुढे चाललेत. मी इतके दिवस त्यांच्यावर आक्षेप घेत होतो, त्यांनी अशा प्रकारे पक्ष चोरला म्हणून...पण खरेच आहे. वारसच असे असतील तर पर्याय काय? तुमच्यासमोर रामायणावर कुणी टीका करतेय ते ऐकून घेताय, तुम्ही वक्फ बोर्डाचं समर्थन करता, संघात एक कार्यकर्ता जातो, तुम्ही त्याचा जाहीर बैठकीत अपमान करता, ही सवय बरोबर नाही असं सांगत प्रकाश महाजनांनी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरेंवर घणाघात केला.दरम्यान, आम्ही हिंदुत्वासाठी मनसेत गेलो होतो. भाजपाचं हिंदुत्व अंगावरचं कपड्यासारखे आहे, राज ठाकरेंचं हिंदुत्व अंगावर चिटकलेल्या त्वचेसारखे आहे ही मी व्याख्या केली होती. मी राज ठाकरेंमध्ये तसा नेता पाहिला आहे. महापालिकेत सत्ता येण्यासाठी बहुदा राज ठाकरेंनी हिंदुत्वाबाबत मवाळ भूमिका घेतल्याचे दिसून येते. मनसेच्या लोकप्रियतेचा उच्चांक मशिदीवरील भोंग्याचा प्रश्न आम्ही हाती घेतला तेव्हा वाढला होता, मात्र आजही भोंगे सुरू आहेत, परंतु आंदोलन कुठे चालू नाही. राजकारणात भूमिका बदलल्या पाहिजे, पण काही मते स्थायी असली पाहिजे. हा बदल होताना दिसला त्याचे वाईट वाटले. मला त्यांच्याकडून अपेक्षा होती, मी फक्त बोलून दाखवली असं प्रकाश महाजन यांनी म्हटलं आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका धोक्यात : ओबीसी च्या ५०% आरक्षण मर्यादेवरून सुप्रीम कोर्टाने सरकारला फटकारले; उद्या पुन्हा सुनावणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये ओबीसी आरक्षणाच्या मर्यादेबाबत निर्माण झालेल्या गोंधळामुळे आता परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. ओबीसींसाठी २७ टक्के आरक्षण लागू करण्याच्या सरकारच्या निर्णयामुळे अनेक शहरांमध्ये एकूण आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादेपलीकडे गेल्याचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात उपस्थित झाला. या याचिकेवर सुनावणी घेताना न्यायालयाने राज्य सरकारला स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे. ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडू नका, अन्यथा आम्ही निवडणुका थांबवू. न्यायालयाच्या या कठोर भूमिकेमुळे २ डिसेंबरला होणाऱ्या नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांवर अनिश्चिततेचे सावट पसरले आहे. या प्रकरणी उद्या पुन्हा सुनावणी होणार आहे.



मराठवाड्यातील अनेक पालिकांमध्ये २७ टक्के ओबीसी आरक्षण लागू केल्यानंतर आरक्षणाचा टक्का वाढल्याची बाब याचिकाकर्त्याने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. विकास गवळी यांनी दाखल केलेल्या या याचिकेवर न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमला बागची यांच्या खंडपीठाने सोमवारच्या सुनावणीत संताप व्यक्त केला. न्यायालयाने स्पष्ट केले की त्यांच्या पूर्वीच्या आदेशातच म्हटले होते की, बांठिया आयोगाच्या आधी जी परिस्थिती होती, त्यानुसारच निवडणूक घ्याव्यात. म्हणजेच, ओबीसी आरक्षण नसतानाचा आराखडा वापरला पाहिजे. परंतु सरकारने या आदेशाचा सोयीचा अर्थ काढून आरक्षण वाढवले, अशी कठोर टिप्पणी न्यायालयाने केली.

या सुनावणीत अनेक मुद्द्यांवर तीव्र चर्चा झाली. राज्याचे महाधिवक्ता तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितले की, निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे आणि काही मुदती वाढवता येणार नाहीत. मात्र, न्यायालयाने त्यांच्या या कारणांवर समाधान व्यक्त केले नाही. न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले, आमचा आदेश अगदी सरळ होता, पण तुमच्या अधिकाऱ्यांनी गोंधळ केला आहे. ५० टक्क्यांच्या वर आरक्षण गेलं तर निवडणूक प्रक्रियाच आम्ही रोखू शकतो. न्यायमूर्ती जॉयमला बागची यांनीही घटनेतील आरक्षण मर्यादेचा उल्लेख करून सरकारला खबरदारीचा इशारा दिला.

# शिवसेनेच्या श्रीकांत शिंदेचे विश्वासू म्हात्रेंच्या हाती कमळ महापालिका निवडणुकीपूर्वी भाजपचा मास्टरस्ट्रोक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून सुरू असलेली आक्रमक मोहीम मंगळवारी मोठ्या घडामोडींना कारणीभूत ठरली. अनेक दिवसांपासून गुप्तता ठेवून भाजपने स्थानिक राजकारणात मोठा फटका देण्याची तयारी केली होती. याच अनुषंगाने कल्याण-डोंबिवलीतील शिवसेनेशी संबंधित माजी नगरसेवक आणि प्रभावशाली नेत्यांचा भाजपमध्ये पक्षप्रवेश करण्यात आला. या सोहळ्यापूर्वी नेमके कोण कोण प्रवेश करणार याची माहिती लपवण्यात आली होती, त्यामुळे राजकीय वर्तुळात चांगलीच उत्सुकता निर्माण झाली होती. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात शेकडो कार्यकर्त्यांनी कमळाचे निशाण हातात घेतले.

यातील सर्वात चर्चेचा विषय ठरला तो म्हणजे शिवसेनेचे दिवंगत नेते व पाच वेळा नगरसेवक राहिलेले वामन म्हात्रे यांचे सुपुत्र अनमोल वामन म्हात्रे यांचा भाजपमध्ये प्रवेश. अनमोल म्हात्रे आणि त्यांची पत्नी अश्विनी म्हात्रे यांनी शिंदे गटाला रामराम ठोकत भाजपचा झेंडा हाती घेतला. कल्याण-डोंबिवली परिसरात वामन म्हात्रे यांचे मोठे राजकीय वजन आणि जनाधार होता. त्यांच्या पुण्याईचा लाभ



अनमोल म्हात्रे यांना मिळत असल्याने आगामी महानगरपालिका निवडणुकीत त्यांची ताकद भाजपच्या गोटात जाणे हा शिवसेनेला मोठा धक्का मानला जात आहे. विशेष म्हणजे, अनमोल यांच्या प्रवेशाची बातमी शेवटच्या क्षणापर्यंत पूर्णपणे गुप्त ठेवण्यात आली होती.

एकनाथ शिंदे आणि भाजपचे संबंध महायुती सरकार स्थापन झाल्यापासून ताणले गेले आहेत. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हा दोन्ही पक्षांसाठी प्रतिष्ठेचा विषय असल्याने इथे संघर्ष अधिकच वाढला आहे. गेल्या काही महिन्यांपासून भाजपने स्वबळावर निवडणूक लढवण्याचा सूर वाढवला असून स्थानिक नेतृत्वाला बळकट करण्यावर त्यांनी भर दिला आहे. इतर पक्षातील नेत्यांना भाजपमध्ये आणून संघटना मजबूत करण्याचा प्रयत्न सुरूच आहे. मात्र, शिंदे गटातील प्रभावशाली मानले जाणारे अनमोल म्हात्रे यांना भाजपने आपल्या वाटेवर आणल्याने राजकीय समीकरणांमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**श्रीकांत शिंदे यांच्यासाठी गंभीर धक्का**

या घडामोडींमुळे शिंदे गटावर दबाव वाढला असून ते यावर कशी प्रतिक्रिया देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. कल्याण-डोंबिवलीमध्ये शिंदे गटाचे लोकसभा सदस्य श्रीकांत शिंदे हे महत्वाची भूमिका बजावत असल्याने त्यांच्यासाठी हा धक्का अधिक गंभीर मानला जातो.

## संपादकीय ......

# डुबेंगे साथ में...

नुकत्याच बिहारच्या विधानसभा निवडणुका पार पडल्या. युती किंवा आघाडी करताना ज्यांनी असंगाशी संग केला, त्यांचा निवडणुकीच्या भाषेत बोलायचे तर सुपडासाफ झाला असे म्हणता येईल. 'हम तो डुबेंगे सनम, तुमको भी लेकर डुबेंगे' अशा पद्धतीने दोन मित्र एकत्र आले आणि दोघेही पराभूत झाले. बरेचदा आपल्याकडेही असेच होते. पाय घसरून पडल्यामुळे किंवा चुकीच्या पद्धतीने तलावात उतरल्यामुळे एक जण पाण्यात गटांगळ्या खायला लागतो.

किनार्यावर असलेला एखादा धाडसी तरुण मागचा-पुढचा विचार न करता बुडणार्या माणसाला वाचवायला जातो. जो बुडत असतो तोही कुठून काही मदत मिळेल का, हे कसेबसे पाहत असतो. वाचवणारा बुडणार्याच्या जवळ गेल्यानंतर मरणाच्या भीतीने हादरलेला तो वाचवणार्या व्यक्तीच्या गळ्याला मिठी मारतो आणि मग दोघेही बुडायला लागतात आणि बरेचदा बुडतातसुद्धा. अशीच काही गत 'कंदील'वाल्या पक्षाची झाली आहे. हाताच्या 'पंजा'चा भरभक्कम आधार मिळेल आणि आपल्या जास्त जागा निवडून येतील, असा कयास लावणार्या कंदील राजपुत्राने दुसर्या एका राजपुत्राला सोबत घेतले आणि दोघेही बुडाले.

सध्या आपल्या महाराष्ट्रात येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांची जोरदार तयारी सुरू आहे. नगरपालिकांचा धुरळा उडाला आहे. तिथेही काहीसा असाच प्रकार सुरू आहे. आपण ज्या पक्षाबरोबर युती किंवा आघाडी करत आहोत त्याच्यामुळे आपण तरणार की बुडणार, हे निवडणुकांचे निकाल लागल्यानंतरच समजत असते. नगरपालिकांनंतर महानगरपालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुकांची रणधुमाळी असणार आहे.

जनता ही नेहमी गुगली टाकत असते. जनतेच्या मनात काय आहे, हे शेवटपर्यंत कोणाला कळत नाही. म्हणूनच जनतेला 'जनता जनार्दन' म्हणत असावेत; परंतु सुप्त अशी लाट प्रत्येक निवडणुकीमध्ये असते. शिवाय एक्झिट पोलचे अंदाजदेखील वेगळ्या अर्थाने चुकले म्हटले पाहिजेत. विविध कल चाचण्यांमध्ये अनेकांनी सत्ताधार्यांना कल मिळेल म्हणून सांगितले होते. ते खरे ठरले असले, तरी जागा मिळण्याबाबत थोडे चुकीचेच ठरले. कारण, जिंकणार्या जागा जास्तच मिळाल्या. केवळ एकाच एक्झिट पोलचा अंदाज बरोबर ठरला, असे समोर आले आहे.आणखी एक पारंपरिक विचार बिहार निवडणुकीने मोडून काढला आणि तो म्हणजे मतदान जास्त होते तेव्हा ते सध्याच्या सत्ताधार्यांच्या विरोधात होते. असे काही समीकरण भारतीय राजकारणामध्ये होते. यावर्षी बिहारने हे मोडून काढले आहे. जास्त झालेले मतदान सत्ताधारी पक्षाला मिळून तोच पक्ष पुन्हा सत्तेवर आला आहे. राज्य पातळीवर युती किंवा आघाडी करताना असंगाशी संग जे पक्ष करतील त्यांची दुर्दशा भले झालेली पाहायला मिळेल, हे मात्र निश्चित आहे.

# दर्यापूर येथे नगराध्यक्ष पदाची निवडणूक सप्तरंगी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८दर्यापूर –**
दर्यापूर नगर परिषद निवडणूक रणसंग्राम आता खऱ्या अर्थाने सुरू झाला असून या निवडणुकी करिता नगराध्यक्ष व २५ नगरसेवक पदाकरीता उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आजचा शेवटचा दिवस आहे. काल रात्री पर्यंत दर्यापूर नगर परिषद निवडणूक करिता चार प्रमुख पक्षांनी आपले नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जाहीर केले असून त्यामध्ये राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून समाजसेविका सौ. मंदाकिनी सुधाकरराव भारसाकळे, भारतीय जनता पक्ष-राष्ट्रवादी अजित पवार पक्ष यांच्या युतीद्वारे माजी नगराध्यक्ष सौ. नलिनी प्रकाशराव भारसाकळे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष-मनसे युतीकडून उच्चशिक्षित उमेदवार प्रा.डॉ भावना संकेत भुतडा, शिवसेना शिंदे पक्षाकडून माजी नगरसेवक प्रदीप गोपालजी मलिये यांना उमेदवार जाहीर झाली आहे.




तर आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्ष, वंचित बहुजन आघाडी, एमआयएम व इतर पक्षाचे उमेदवार जाहीर होतील तर नगरसेवक पदासाठी कोणाला कोणत्या पक्षाकडून उमेदवारी देण्यात आली हे सुद्धा स्पष्ट होणार आहे त्यामुळे दर्यापूर नगर परिषद निवडणुकीचे चित्र आज संध्याकाळ पर्यंत स्पष्ट होणार असून सर्वच राजकीय पक्षातील अनेक इच्छुक उमेदवार यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्यातील कोण माघार घेणार याव कोण पक्षांतर करून आपल्याच पक्षाविरुद्ध दंड ठोठावणार हे लवकरच समजणार आहे. आज तरी दर्यापूर नगर परिषद नगराध्यक्ष पदाची निवडणूक 'सप्तरंगी' होणार असून नगरसेवक पदासाठी सुद्धा सात मुख्य पक्ष व अपक्ष यांनी आपले उमेदवार रिंगणात उतरविले आहेत. या निवडणुकीत मतदार राजा कोणाला संधी देणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## राष्ट्रीय शालेय फुटबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघ निवड चाचणी अमरावती येथे संपन्न

# अमरावती फुटबॉल संघटनेच्या वतीने रायुकाँ क्रीडा अध्यक्ष सार्थक खोरगडे यांचा सत्कार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती–** आगामी वर्षात झारखंड येथे होणाऱ्या राष्ट्रीय शालेय फुटबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा १४ वर्ष वयोगटातील मुले व मुलींचा संघ निवडण्यासाठी अमरावती येथील सायन्सकोर मैदान पोलीस फुटबॉल क्रीडांगण येथे राज्यस्तर शालेय फुटबॉल स्पर्धा दिनांक १३ ते १५ नोव्हेंबर पर्यंत संपन्न झाली. या स्पर्धेत महाराष्ट्रातील ८ विभागातील १६ मुले व ८ मुलींचे संघ असे एकूण तीनशे खेळाडू सहभागी झाले होते. जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अमरावती तसेच अमरावती फुटबॉल संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेतील सर्व सामने सकाळी व दुपारच्या सत्रात पार पडले. स्पर्धेतील समारंभ कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र ऑलम्पिक संघटना उपाध्यक्ष अँड. प्रशांत देशपांडे, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव,अमरावती फुटबॉल संघटना सचिव सुशील सुर्वे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस क्रीडा विभागअध्यक्ष सार्थक खोरगडे ,तालुका क्रीडा अधिकारी अनिल इंगळे, सलीम शेख, आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान स्पर्धेत प्राविण्य प्राप्त करणाऱ्या प्रथम तीन संघांना मुले व मुली यांना स्वतंत्रपणे मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह व मेडल्स देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच अमरावतीच्या क्रीडा क्षेत्रात विविध स्पर्धांचे आयोजन तसेच प्रशिक्षण व क्रीडा सुविधांच्या उपलब्धतेसाठी नेहमीच पुढाकार घेणारे अमरावती फुटबॉल संघटनेच्या वतीने राष्ट्रवादी युवक काँग्रेस चे क्रीडा विभाग अध्यक्ष सार्थक खोरगडे यांचा अमरावती फुटबॉल संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी हरिहरनाथ मिश्रा, प्रतीक बुंदेले, संजय कथळकर आकाश टाले, विक्की ढाके,गौरी भलावी, रोशन पांडे, राजू वडते , प्रवीण टेकाडे , संतोष विघ्ने , त्रिवेणी बांते , वैशाली इंगळे अनुप वानखडे , प्रफुल्ल डांगे , स्वप्नील चांदेकर आदींसह खेळाडू व क्रीडा प्रेमी उपस्थित होते.

# रब्बी हंगामात हरभरा पेरणीसाठी तज्ज्ञांचा सल्ला

# रायझोबियम बीजप्रक्रिया करा

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**
रब्बी हंगामात हरभरा पेरणी सुरू असताना जमिनीत चांगला ओलावा असल्याने यंदा शेतकऱ्यांनी पेरणीपूर्वी बियाण्याची जैविक खताने बीजप्रक्रिया करणे अत्यावश्यक असल्याचे मत डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या कडधान्य संशोधन विभागातील वैज्ञानिक डॉ. गीतांजली कांबळे यांनी व्यक्त केले.

वेळेवर आणि योग्य पद्धतीने बीजप्रक्रिया केल्यास हरभरा उत्पादनात १० ते १५ टक्क्यांनी वाढ होऊ शकते, असेही त्या म्हणाल्या. रायझोबियमसारख्या जैविक किंवा जिवाणू खतांचा वापर केल्यास पिकांना वातावरणातील नत्र उपलब्ध होते आणि उत्पादनात १० ते १५ टक्क्यांनी वाढ होऊ शकते.

रोपांची वाढ मजबूत होते
पिकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढते
रासायनिक नत्र खतांची २०-२५ टक्के बचत होते
जमिनीचा पोत सुधारतो
उत्पादनात १० ते १५% वाढ संभवते

त्यामुळे पेरणीपूर्वी हरभरा बियाण्यावर रायझोबियम जैविक खताची बीजप्रक्रिया करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

बीजप्रक्रियेसाठी कोणते खत वापरावे?

पिकांना नत्र उपलब्ध करून देणारे रायझोबियम जिवाणू खत हरभरा पिकासाठी उपयुक्त आहे. हे खत बियाण्यावर लावल्याने बियाण्याची उगवण वेगाने होते व रोपे मजबुतीने वाढतात.

जिवाणू खत वापरताना घ्यावयाची काळजी

डॉ. गीतांजली कांबळे व स्मिता बावणे यांनी काही महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत.

जिवाणू खत रासायनिक नसल्याने त्याची विशेष काळजी घ्या.

पाकिटे सावलीत ठेवा; उष्णता व सूर्यप्रकाशापासून दूर ठेवा.

जिवाणू खत लावलेले बियाणे रासायनिक खत किंवा इतर औषधात मिसळू नये.

बुरशीनाशक किंवा कीटकनाशक प्रक्रिया आधी करा; शेवटी जिवाणू खत लावा

पॅकेटवरील अंतिम तारीख तपासूनच वापरा




जिवाणू खत वापरण्याचे अनेक फायदे

उगवण जलद होते
रोपांची जोमदार वाढ
रोगप्रतिकारक शक्ती वाढते
जमिनीचा पोत सुधारतो
रासायनिक खतांची बचत
उत्पादन खर्च घटतो
**एकूण उत्पादनात १०-१५% वाढ**

शेतकऱ्यांसाठी तज्ज्ञांचा सल्ला

रब्बी हंगाम सुरू असताना, हरभरा पेरणीपूर्वी जैविक बीजप्रक्रिया केल्यास कमी गुंतवणुकीत जास्त उत्पादन घेता येते. पिकातील रोगांचा प्रादुर्भावही कमी होतो. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी पेरणीपूर्वी रायझोबियम जैविक खताचा वापर करावा, असे आवाहन तज्ज्ञांनी केले आहे.




## हिवाळ्यातील परफेक्ट स्नॅक हृदयाच्या आरोग्यासाठी मखाना का उत्तम ६ जबरदस्त फायदे

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**
हिवाळा म्हणजे भूक थोडी जास्त लागणारा आणि गरमागरम स्नॅक्सची इच्छा वाढणारा काळ. या दिवसांत बहुतेक लोक चहा नाष्ट्यासोबत भजी, समोसा, चिप्स असे तेलकट पदार्थ खायला जास्त पसंत करतात. पण हे पदार्थ चवीला जरी छान असले तरी शरीरावर त्याचा दुष्परिणाम होतो. वजन वाढणे, कोलेस्ट्रॉल वाढणे, पचन बिघडणे असे प्रश्न निर्माण होऊ शकतात. अशा वेळी एक असा स्नॅक आहे, जो फारच हलका, पौष्टिक आणि शरीरासाठी अतिशय फायदेशीर आहे. तो म्हणजे मखाना!

मखाना हा दिसायला अगदी पांढरा, हलका आणि कुरकुरीत असला तरी त्यात असलेले पोषक तत्व शरीराला अनेक प्रकारे मदत करतात. त्यामुळे फिटनेस सांभाळणारे लोक, वजन कमी करण्याचा प्रयत्न करणारे लोक किंवा हेल्दी स्नॅक शोधणारे सगळेच आज मखाना खूप आवडीने खाताना दिसतात. त्यात फॅट फारच कमी, फाइबर आणि प्रोटीन अधिक, शिवाय एंटीऑक्सीडंट्सही भरपूर असल्याने ते पचायलाही हलके आणि आरोग्यासाठी उत्तम मानले जाते.

हिवाळ्याच्या दिवसांत शरीराची उष्णता टिकवण्यासाठी आणि पोट हलके ठेवण्यासाठी मखाना उत्तम पर्याय ठरतो. चला तर पाहू, मखाना खाण्याचे कोणते ६ शानदार फायदे शरीराला मिळतात.

**वजन कमी करण्यात मदत**
मखान्यात कॅलरी कमी असतात आणि फॅट जवळपास नसते. त्यामुळे ते पोट भरलेले ठेवते पण वजन वाढवत नाही. जाडतोड स्नॅकच्या ऐवजी मखाना खाल्ल्यास वजन नियंत्रणात राहते.

**हृदयासाठी अतिशय चांगले**
मखाना कोलेस्ट्रॉल कमी ठेवण्यात मदत करतो. यात असलेले मॅग्नेशियम हृदयाच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे असते. त्यामुळे हिवाळ्यात वाढणाऱ्या हृदयाच्या समस्या दूर राहू शकतात.

**पचनशक्ती सुधारते** मखान्यातील उच्च प्रमाणातील फाइबर पचन व्यवस्थित ठेवते. बद्धकोष्ठता, पोट फुगणे किंवा अपचन असणाऱ्यांसाठी मखाना अतिशय उपयुक्त आहे.

**शरीरातील दाह कमी करतो** मखाना एंटी-इन्फ्लेमेटरी गुणधर्मांनी भरलेला असतो. शरीरात दाह वाढला तर सांधेदुखी, स्नायूदुखी किंवा थंडीच्या दिवसातील अंगदुखी निर्माण होते. मखाना हे त्रास कमी करण्यात मदत करतो.



**डायबेटिस रुग्णांसाठी योग्य**
मखान्याचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्याने रक्तातील साखर वाढत नाही. त्यामुळे डायबेटिस असणारेही ते सुरक्षितपणे स्नॅक म्हणून खाऊ शकतात.

**त्वचा आणि केसांसाठी फायदेशीर**
मखान्यात असलेले एंटीऑक्सीडंट्स, प्रोटीन आणि अमिनो ऍसिड्स त्वचेचा ग्लो वाढवतात, कोलेजन टिकवतात आणि केस मजबूत करतात. हिवाळ्यात त्वचेची कोरडेपणा कमी व्हायला मखाना मदत करतो. एकूणच मखाना हा हिवाळ्यातील सर्वात हलका, हेल्दी आणि कोणत्याही वेळी खाता येणारा सुपर स्नॅक आहे. भाजून, तुपात हलके परतून, मसाला मखाना म्हणून किंवा दूधात उकळून-तो अनेक प्रकारे खाता येतो. त्यामुळे वजन वाढू नये, शरीर उर्जावान राहावे आणि हृदय मजबूत रहावे असे वाटत असेल तर मखाना तुमच्या रोजच्या आहारात नक्की समाविष्ट करा.

# राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारी 'युनिटी पदयात्रा' उत्साहात संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**
भारताचे लोहपुरुष आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रमुख शिल्पकार सरदार वल्लभभाई पटेल यांची २०२५ हे वर्ष १५० वी जयंती वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. 'मेरा युवा भारत' (युवा कार्यक्रम एवं खेळ मंत्रालय, भारत सरकार) यांच्यामार्फत या सोहळ्याचे औचित्य साधून, राष्ट्रीय एकता दिनानिमित्त (३१ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर २०२५ 'सरदार १५० अभियान') देशभर राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत आज जिल्हास्तरीय 'युनिटी पदयात्रा'चे आयोजन मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय येथे करण्यात आले होते. निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, , महानगरपालिका अमरावतीचे



उपआयुक्त नरेंद्र वानखेडे, मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख आदी मान्यवर उद्घाटन प्रसंगी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी, सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी, राष्ट्रीय एकतेचा संदेश देणारी पथनाट्ये आणि सांस्कृतिक नृत्ये विद्यार्थ्यांनी सादर केली, तसेच उपस्थितांनी आत्मनिर्भर भारताची शपथ घेतली. त्यानंतर, मान्यवरांनी हिरवी झेंडी दाखवून पदयात्रेचा प्रारंभ करण्यात आला. मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय येथून सुरू झालेली ही 'सरदार १५०' पदयात्रा इर्विन चौक मार्गे मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहातून परत महाविद्यालयाकडे मार्गस्थ झाली.

# बांधावरूनच काम होणार टिपटॉप, कृषी अधिकाऱ्यांना मिळणार लॅपटॉप


## कार्यालयातील गर्दी टळणार पीक पाहणी, अनुदान अर्ज भरण्याचे काम त्वरित मार्गी लागणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**
जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विविध शासकीय योजना, पीकविमा, महाडीबीटी अनुदान, पिकपेरणी नोंद, शेती सर्वेक्षण अशा ऑनलाइन सेवांसाठी वारंवार तालुका किंवा मंडळ कार्यालयात जावे लागत होते. मात्र आता ही दगदग मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. कारण ग्रामपातळीवर कार्यरत कृषी अधिकाऱ्यांना राज्य सरकारतर्फे लॅपटॉप देण्यात येणार असून, या माध्यमातून शेतकऱ्यांची सर्व माहिती थेट बांधावरूनच ऑनलाइन नोंदविता येणार आहे. पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील सुमारे ५० अधिकाऱ्यांना लॅपटॉप दिले जाणार आहेत.

लॅपटॉप मिळाल्यानंतर कृषी सहायक व कृषी पर्यवेक्षक शेतकऱ्यांच्या पिकांची पाहणी करून तत्काळ माहिती महाडीबीटी पोर्टलवर अपलोड करू शकतील. पिकांची स्थिती, स्थल माहिती, पाणीस्थिती, पंचनामे, फोटो, अहवाल अशा सर्व महत्त्वाच्या नोंदी रिअल-टाइम प्रणालीत पाठवता येणार आहेत. यामुळे आतापर्यंत आठवडाभर अडकणारी कामे काही मिनिटांत मार्गी लागणार आहे.

आतापर्यंत ही कामे मोबाइलवरून करावी लागत होती. लहान स्क्रीन, कमी नेटवर्क, अर्ज अर्धवट राहणे, माहिती स्वीकारली न जाणे, ग्रामीण भागातील कव्हरेज समस्या यामुळे अधिकारी व शेतकरी दोघांनाही अडचणींचा सामना करावा लागत होता. अनेकदा दिवसाची पाहणी संपल्यावर अधिकाऱ्यांना पुन्हा कार्यालयात परत जाऊन नोंदी अपलोड कराव्या लागत असल्याने वेळ, पैसा आणि श्रम वाया जात होते.

लॅपटॉप उपलब्ध झाल्यास गावातच बसून किंवा शेतातील बांधावरच सर्व कामे पूर्ण करता येतील. शेतकऱ्यांच्या विविध



अर्जांची नोंदणी, अनुदान प्रक्रिया, पीक नुकसानीची नोंद अधिक जलद आणि पारदर्शक पद्धतीने होईल. दुर्गम वस्तीतील शेतकऱ्यांसाठी ही सुविधा विशेषतः उपयुक्त ठरणार आहे.राज्यभरातील सर्व कृषी अधिकाऱ्यांना टप्प्याटप्प्याने लॅपटॉप देण्यासाठी विभागाने निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. लॅपटॉप मिळाल्याने कामाची गुणवत्ता वाढेल, वेळ वाचेल आणि पारदर्शकता सुनिश्चित होईल, अशी प्रतिक्रिया कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. १८ नोव्हेंबर २०२५ शहर/ग्रामिण




# कोठा येथे साडी निर्मिती उद्योग उभारणार-केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

## मेळघाटातील रस्त्यासाठी मार्ग काढणार, मदर डेअरीचे दोन दूध संकलन केंद्र सुरू करणार







**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती–**

मेळघाटातील आदिवासींना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात आणि त्यांचा आर्थिक विकास व्हावा यासाठी विविध प्रयत्न करण्यात येत आहेत. कोठा येथील संपूर्ण बांबू केंद्रात बांबूपासून विविध वस्तू तयार करण्यात येत आहेत. येत्या काळात या ठिकाणी पाच कोटी रुपयांच्या कोसा साडी निर्मितीचा उद्योग उभारण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. धारणी तालुक्यातील कोठा येथे भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त आज कार्यक्रम पार पडला, यावेळी कांचन गडकरी, संपूर्ण बांबू केंद्राच्या अध्यक्ष डॉ. निरुपमा देशपांडे, योगेश बापट आदी उपस्थित होते.श्री. गडकरी म्हणाले, आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यांचा विकास व्हावा, समाजात स्थान मिळावे, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. आदिवासींमध्ये कौशल्य असून त्यास प्रशिक्षणाची जोड देणे आवश्यक आहे. संपूर्ण बांबू केंद्राच्या माध्यमातून बांबूच्या सुबक वस्तू तयार करण्यात येत असून जगभरातील ६० देशांमध्ये या वस्तू पोहोचल्या आहेत. त्यामुळे ग्राहक आपल्यापर्यंत चालून आला पाहिजे, अशा वस्तू निर्मिती करण्यावर भर द्यावा. आज विविध क्षेत्रात तंत्रज्ञानाने प्रगती केली आहे. याचा उपयोगही करून घेणे आवश्यक आहे. कोशाच्या साडीला जगभरात मागणी असून यासाठी पाच कोटी रुपयांचा प्रकल्प उभारण्यात येईल. प्रकल्पासाठी आवश्यक असणारा दोन कोटी रुपयांचा स्वनिधी संस्थेसाठी देणगी देण्यात येणार आहे. तसेच तीन कोटी रुपयांचे केंद्राचे सहकार्य देण्यात येईल. साडी निर्मितीसाठी आवश्यक ते प्रशिक्षणही उपलब्ध करून देण्यात येईल. मेळघाटातील रस्त्यांच्या प्रश्नांची पूर्ण जाण आहे.

रस्त्यांच्या विकासाशिवाय या भागाचा विकास शक्य नाही. देशातील महामार्गाचे काम एशियन बँक करीत आहे. त्यामुळे राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून या रस्त्याचे काम कशा पद्धतीने करण्यात येईल, याची माहिती घेण्यात येईल. मेळघाटातील युवकांच्या शिक्षणाच्या व्यवस्थेसाठी दरवर्षी दहा लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येत असून यामुळे गरजू विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची सोय होईल. तसेच मदर डेअरीच्या माध्यमातून दूध संकलनासाठी धारणी आणि अन्य एका ठिकाणी केंद्र उभारण्यात येईल. यातून दररोज नगदी पैसे मिळण्यास मदत होईल. यावेळी श्री. गडकरी यांच्या हस्ते कारागीर हाटचे विमोचन करण्यात आले.

डॉ. निरूपमा देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. योगेश बापट यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच प्रशिक्षणार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी गरजू कुटुंबांना गॅस शेगडीचे वितरण करण्यात आले.



# शिवसेना उबाठा काँग्रेस मध्ये सत्तासंघर्ष पेटणार

## दोन्ही पक्षाची एकाच समुदायात मतांसाठी घुसखोरी

**सचिन पाटील अब्रुक**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी नगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी अचंबित करणाऱ्या राजकीय घडामोडी घडल्या आहेत. अंजनगाव नगरपालिका नगराध्यक्ष पदासाठी शिवसेना उबाठा पक्षाचे आमदार गजानन लवटे यांचे सुपुत्र यश लवटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर काँग्रेस पक्षाच्या वतीने नगराध्यक्ष पदासाठी आयशा बानो रशिद खा यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने राजकीय चर्चेला उधाण आले असून काँग्रेस पक्षाने शिवसेना उबाठा गटासाठी राजकीय डाव आखल्याची राजकीय क्षेत्रात चर्चा रंगली आहे.शिवसेना उबाठाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार पराभूत होण्यासाठी काँग्रेस पक्ष डाव आखत असताना शिवसेना उबाठा पक्षाने राजकीय रणनिती आखून २८ नगरसेवक जागेतील ८ उमेदवार काँग्रेस पक्षाचे वोट बँक समजल्या जाणाऱ्या उमेदवारांना देऊन शिवसेना उबाठा पक्षाने काँग्रेस पक्षाचा डाव हाणून पाडला आहे तर काँग्रेस पक्षावर शिवसेना उबाठा भारी पडलेली दिसून येत आहे.अंजनगाव नगरपालिका क्षेत्रात काँग्रेस पक्षाचे वोट बँक समजल्या जाणाऱ्या एक समुदाय मोठ्या संख्येने असून त्या मतदारांची संख्या नगरपालिका हद्दीत १८ हजारांच्या आसपास आहे. त्यामुळे या मतदारांवर शिवसेना उबाठा, काँग्रेस या दोन्ही पक्षाचा आपल्याकडे वळविण्याचा डाव होता.शहरातील सर्वात जास्त संख्येने असलेल्या समुदायातील नगराध्यक्ष पदाची उमेदवारी काँग्रेस पक्षाने दिली तर शिवसेना उबाठा पक्षाने आठ उमेदवारांना नगरसेवक पदासाठी उमेदवारी संधी देऊन त्या समुदायाच्या मतांवर बाजी मारल्याने राजकीय क्षेत्रात चांगलीच चर्चा रंगत आहे.शहरातील सर्वात मोठा मतदार असलेला समुदाय अखेर च्या दिवशी कोणता निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# लगीन घाई! यंदा डिसेंबर महिन्यांपर्यंत केवळ आठच दिवसांचे मुहूर्त, नववर्षात किती? जाणून घ्या...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

सरत्या वर्षात लग्नसोहळ्यांचा जल्लोष अवघ्या काही दिवसांपुरता दिवसांचा शुभ काळ असणार आहे.

अधिक मास, ग्रहण, मलमास व चांद्रमासातील विसंगतीमुळे शुभ

### विवाह, मुंजीचे दिवस

| महिना – | विवाह शुभ दिवस – | मुंजीसाठी शुभ दिवस |
|---|---|---|
| नोव्हेंबर २०२५ | ६ | ४ |
| डिसेंबर २०२५ | २ | २ |
| फेब्रुवारी २०२६ | ९ | ४ |
| मार्च २०२६ | ८ | ४ |
| एप्रिल २०२६ | ६ | ३ |
| मे २०२६ | ७ | ३ |
| जून २०२६ | ५ | ० |
| जुलै २०२६ | ६ | ० |

मर्यादित असेल. या वर्षात केवळ आठ तर २०२६ या पुढील संपूर्ण वर्षभरात अवघे ४९ शुभ दिवस विवाह मुहूर्त आहेत. तर, उपनयनासाठी केवळ २० दिवसांची संख्या घटली आहे. पण, फेब्रुवारी ते जुलैपर्यंतच्या काळातच बहुतेक मुंज व विवाह पार पडतील. जानेवारी २०२६ मध्ये मलमास (अमुहूर्त काळ)



असल्याने मुंजी होत नाहीत. तर, अधिक ज्येष्ठ मास १७ मे ते १५ जून २०२६ दरम्यान असल्याने त्या काळातही उपनयन व विवाह होणार नाहीत. त्यामुळे उर्वरित मुहूर्त गाठण्यासाठी इच्छुक वधू-वरांसह त्यांच्या कुटुंबीयांची धावपळ वाढणार आहे, असे जाणकारांनी सांगितले.

**कार्यालये, बँडचे बुकिंग**

लग्नहंगामासाठी हॉटेल, लॉन्स, बँक्वेट हॉल, बँडपथक आणि केटरर्स यांची आगाऊ बुकिंग सुरू करण्यात आली आहे. शहरातील लोकप्रिय मंगल कार्यालयांची बुकिंग पूर्ण झाली असून अनेकांना निराश होऊन परतावे लागत आहे. तर, डेकोरेशन, बँडपथक, केटरिंग, मंगल कार्यालये, मेकअप आर्टिस्ट यांची धावपळ सुरू झाली आहे.

**२२ नोव्हेंबरपासून**

> २०२६ मध्ये ग्रहस्थिती व अधिक मासामुळे विवाहयोग्य दिवसांची संख्या घटली आहे. पण, फेब्रुवारी ते मे या काळात उत्तम योग जुळून येईल. जानेवारीत मलमास व मे-जूनमध्ये अधिक मास असल्याने थोडी उसंत मिळेल. उपनयन संस्कारांसाठी केवळ २० दिवसांचा शुभकाळ असल्याने एकाच दिवशी अनेक मुंजींचे बुकिंग होत आहे.
>
> **–वैभव रानडे, पुरोहित**

**उडणार लग्नाचा बार–**

२२ नोव्हेंबरपासून पुन्हा विवाहसोहळ्यांचा हंगाम सुरू होत आहे. २२ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या १३ दिवसांत २२, २४, २५, २७, २८, २९ नोव्हेंबर व ३, ५ डिसेंबर असे आठ शुभ मुहूर्त आहेत.

# १० नप, २ नपं. निवडणुकीत जिल्ह्यात ध्रुवीकरणाची खेळी

## काँग्रेसकडून नगराध्यक्षपदांसाठी चार मुस्लिम उमेदवार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती–** जिल्ह्यात दहा नगरपालिका आणि दोन नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी विविध पक्षांनी शक्तिप्रदर्शन केले. दरम्यान, भाजपच्या धृवीकरणाच्या प्रयोगाला उत्तर देण्यासाठी काँग्रेसने अंजनगाव सुर्जी, चिखलदरा, अचलपूर आणि चांदूर बाजार या चार ठिकाणी नगराध्यक्षपदासाठी चार मुस्लिम उमेदवार दिल्याने राजकीय वर्तुळात त्याची चर्चा रंगली आहे. काँग्रेसने अंजनगाव सुर्जी येथून नगराध्यक्षपदासाठी आयेशाबानो रशीद खान यांना, चिखलदरा येथून शेख अब्दूल शेख हैदर, अचलपुरातून नुरूसबा ऐहतेशाम नबील तर चांदूर बाजार येथून – फरहाना तबस्सुम मो. साजिद यांना नगराध्यक्षपदाची उमेदवारी देण्यात आली आहे. काँग्रेसने धामणगाव – रेल्वे येथून वर्षा वसंतराव देशमुख, दर्यापूर येथून मंदाताई सुधाकर भारसाकळे, चांदूर रेल्वेमधून पूनम नीलेश सूर्यवंशी, मोर्शीतून दीपाली भडांगे, धारणीतून राजकिशोर मालवीय आणि नांदगाव खंडेश्वर येथून वीणा निशांत जाधव यांना नगराध्यक्ष पदाची उमेदवारी देण्यात आली आहे. आज काँग्रेसच्या उमेदवारांनी शक्तिप्रदर्शन करून उमेदवारी अर्ज दाखल केले.

काँग्रेसने जिल्ह्यात स्वबळावर निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव ठाकरे गटासोबत काही ठिकाणी त्यांचा थेट संघर्ष होण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे भाजपने दर्यापुरात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटासोबत युती केली असून इतर ठिकाणी भाजप स्वबळावरइतर ठिकाणी भाजप स्वबळावर निवडणूक लढवीत आहे. भाजपच्या धृवीकरणाच्या प्रयोगाला शह देण्यासाठी काँग्रेसने चार मुस्लिम उमेदवार दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

> **मतचोरी न झाल्यास विजय पक्का**
>
> संपूर्ण राज्यात भाजपविरोधी वातावरण आहे. लोक सरकारच्या धोरणांना कंटाळले आहेत. ते मतांमध्ये प्रतिबिंबित व्हायला हवे. पण, ज्या प्रकारे मतचोरीचा, मतदार व्यवस्थापनाचा खेळ भाजपकडून केला जात आहे, तो जर यावेळीही झाला, तर धोका होऊ शकतो. पण, आमचा विजय निश्चितपणे होईल, असा आत्मविश्वास आम्हाला आहे. ज्या भागात मुस्लीमांना योग्य प्रतिनिधित्व मिळायला हवे, त्यांना वेळोवेळी काँग्रेसने उमेदवारी दिली आहे. गेल्यावेळीही देण्यात आली होती. त्यात व्यूहनिती नाही, असे काँग्रेसच्या नेत्या माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी सांगितले.–

# शहराच्या भुयारी गटारसाठी अमृत-२ योजना का नाही ?-डॉ. सुनील देशमुख

## सहा वर्षांपासून योजनेची कामे पूर्णतः ठप्प

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८ अमरावती–** शहरातील भुयारी गटार योजनेची कामे गेल्या सहा वर्षात पूर्णतः ठप्प पडलेली आहेत. माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी ॲड. शाहू चिखले यांच्यामार्फत यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये याचिका दाखल केली होती. याचिकेवर सुणावणीदरम्यान अमरावती शहराच्या भुयारी गटार योजनेसाठी अमृत योजना का नाही, अशी विचारणा न्यायालयाने केली. केंद्रालासुद्धा या जनहित याचिकेमध्ये प्रतिवादी करण्यात यावे व राज्य शासनाच्या नगर विकास विभागासह महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने चार आठवड्यात उत्तर सादर करावे, असे न्यायालयाने निर्दे शित केलेले आहे.महाराष्ट्र शासनाने सर्व विभागीय मुख्यालयापैकी भुयारी गटार योजनेतून एकमेव अमरावती शहराला वंचीतठेवले आहे. गटारे बंदिस्त न झाल्याने उघड्या नाल्यांमुळे शहरातील हजारो नागरिक डेंग्यू, मलेरिया यासारख्या जीवघेण्या आजाराने बळी पडलेले आहेत. २०१४ ते २०१९ या काळातमंजूर होऊन कार्यारंभ आदेश झालेली कामेसुद्धा पूर्णत्वास नेण्यात प्रशासन व लोकप्रतिनिधी पूर्णतः अपयशी ठरलेले आहेत, असे सांगत माजी मंत्रीडॉ. सुनील देशमुख यांनी अमरावती शहरातील प्रथितयश अधिवक्ता शाहू चिखले यांच्या सहकार्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये रखडलेल्या अमरावती भुयारी गटार योजनेच्या विषयावर महाराष्ट्र शासन, सचिव, पाणीपुरवठा व मलनिस्सारण, सचिव नगर विकास विभाग, कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व आयुक्त महानगरपालिका अमरावती यांना प्रतिवादी करून जनहित याचिका दाखल केलेली होती. न्यायमूर्ती अनिल किलोर व न्यायमूर्ती रजनीश व्यास यांच्या पीठासमोर सुनावणीदरम्यान अमरावती शहराच्या भुयारी गटार योजनेसाठी अमृत योजना का नाही, अशी विचारणा न्यायालयाने राज्य शासनाला केली आहे. तसेच केंद्रालासुद्धा या जनहित याचिकेमध्ये प्रतिवादी करण्यात यावे व राज्य शासनाच्या नगर विकास विभागासह महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून चार आठवड्यात उत्तर सादर करण्यास निर्देशित केलेले आहे.



> **कार्यारंभ आदेशानंतरही काम ठप्प**
>
> अस्तित्वातील ज्या भागात कामे पूर्णत्वास आलेली आहे या भागातील २५,००० नागरिकांचे प्रॉपर्टी कनेक्शन शासनाच्या बचनि भुयारी गटाराला जोडण्यासाठी डॉ. सुनील देशमुख यांनी वर्ष २०१८ मध्ये ५९.५६ कोटी रुपयांच्या निधी मंजूर करून आणला होता. परंतु महाराष्ट्र जीवन प्राधिकरण गेल्या सहा वर्षात हे मंजूर काम पुर्णत्वास नेण्यास सपशेल अपयशी ठरलेले आहे.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवात सहभागी होण्यासाठी आज अंतिम मुदत

## इच्छुकांना अर्ज सादर करण्याचे आवाहन




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती-** अमरावती जिल्ह्याच्या युवकांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागावा यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन बुधवार, दि. १९ नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे. या युवा महोत्सवात सहभागी होण्यासाठी संस्था/मंडळे किंवा वैयक्तिक स्पर्धकांनी आपले विहित नमुन्यातील प्रवेश अर्ज उद्या, दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, तपोवन चौक विद्यापीठ समोर, मार्डी रोड, अमरावती येथे कार्यालयीन वेळेत सादर करावे. अंतिम मुदतीनंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद घेण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केले आहे. या युवा महोत्सवात लोकनृत्य, लोकगीत, कथालेखन, काव्यलेखन, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा यांसारख्या विविध सांस्कृतिक आणि कौशल्य विकास स्पर्धांसह विज्ञान प्रदर्शन (नवोपक्रम ट्रॅक) चा समावेश आहे. महोत्सवाचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल, मार्डी रोड, तपोवन चौक येथे होणार असून विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन श्री शिवाजी उद्यान विज्ञान महाविद्यालयात करण्यात येणार आहे. या महोत्सवात १५ ते २९ वयोगटातील (दि. १२ जानेवारी २०२६ रोजी वयाची गणना) महाराष्ट्रातील रहिवासी युवक-युवती सहभागी होऊ शकतात. स्पर्धेत भाग घेणाऱ्यांसाठी My Bharat Portal वर नोंदणी करणे बंधनकारक आहे. कौशल्य विकास स्पर्धा जसे कथालेखन (६० मि.), काव्यलेखन (९० मि.) आणि चित्रकला (९० मि.) यासाठी 'नशा मुक्त युवा', 'तरुणाईची निरोगी जीवनशैली', 'नेतृत्वातील महिला', 'भारत १००: सर्वसमावेशक विकासासाठी रूपरेषा' यासारखे विषय देण्यात आले आहेत. कथालेखन व काव्यलेखनासाठी मराठी, हिंदी व इंग्रजी यापैकी कोणतीही भाषा निवडता येईल. विज्ञान प्रदर्शनात जैवतंत्रज्ञान, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यांसारख्या अभिनव संकल्पनांवर आधारित प्रकल्प सादर करता येतील. या महोत्सवात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्यांची निवड थेट विभागस्तरीय युवा महोत्सवासाठी केली जाईल, ज्यातून पुढे राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी (जानेवारीमध्ये) संधी मिळेल. जिल्ह्यातील सर्व अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषी महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील युवक-युवतींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन क्रीडा विभागाने केले आहे.

# 'तो' लव्ह जिहाद प्रेमी पोलिसांच्या ताब्यात

## महिला म्हणाली, मी त्याच्यासोबत केले लग्न

**कडक पोलिस बंदोबस्तात वैद्यकीय तपासणी नांदगावपेठ पोलिस स्टेशन परीसरात वातावरण तापले**




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती,** नांदगावपेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका विवाहित महिलेला प्रेमाच्या जाळ्यात अडकवून तिच्या घरातून अपहरण केले, या प्रकरणी तिच्या कुटुंबीयांनीं'लव्ह जिहादचा आरोप करत पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. दहा दिवसांनंतर, सोमवारी, पोलिसांनी कथित लव्ह जिहाद प्रियकराला ताब्यात घेतले आणि त्याला पोलिस ठाण्यात आणले. गावकऱ्यांना हे कळताच, मोठी गर्दी जमली आणि तणावपूर्ण वातावरण निर्माणझाले. त्यानंतर महिलेला वैद्यकीय तपासणीसाठी कडक पोलिस बंदोबस्तात जिल्हा रुग्णालयात आणण्यात आले.नांदगावपेठ येथील एकाविवाहित महिलेचे फूस लावून अपहरण केल्याच्या घटनेमुळे गावात तीव्र संताप निर्माण झाला. त्यानंतर, महिलेच्या पतीने ७ नोव्हेंबर रोजी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. आरोपी पुरुषाने त्याच्या पत्नीला प्रेमाच्या बहाण्याने पळवून नेले, असा आरोप पतीने तक्रारीत केला होता. या महिलेला पाच वर्षांचा मुलगा आणि तीन वर्षांची मुलगी आहे, या दोन्ही चिमुकल्याची आई अचानक बेपत्ता झाल्याने कुटुंबावर मोठे संकट ओढवले आहे. त्यामुळेया प्रकरणात ठोस कारवाई न झाल्याने गावकऱ्यांचा रोष वाढला आहे. पोलिसांच्या निष्क्रियतेमुळे संताप वाढत आहे. दोन दिवसांपूर्वी एका स्थानिक भाजप कार्यकर्त्याने पोलिस ठाण्यात धाव घेतली होती. कारवाई न केल्यास आंदोलन करण्याची इशारा दिला होता.दरम्यान, पोलिसांचे पथक आरोपीच्या गावाला भेट देऊन रिकाम्या हाताने परतले, त्यांना काहीही सापडले नाही, मात्र वाद वाढण्याची चिन्हे दिसताच पोलिसांनीलव्ह जिहादच्या त्या कथित महिला आणि तिच्या प्रियकराला ताब्यात घेतले आणि सोमवारी संध्याकाळी त्यांना पोलिस ठाण्यात आणले.ग्रामस्थांना हे कळताच, गर्दी जमली आणि आरोपींवर कडक कारवाई करण्याची मागणी केली. तणावाची स्थितीमाहून पोलिस ठाण्याच्या आवारात कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला. परिणामी, दामिनी पथक, क्यूआरटी कमांडो आणि स्थानिक पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली महिलेला वैद्यकीय उपचारांसाठी जिल्हा रुग्णालयात आणण्यात आले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून, जिल्हा रुग्णालयाचे चॅनेल गेट देखील बंद करण्यात आले. आरोप-प्रत्यारोप सुरू असताना पोलिस रात्री उशिरापर्यंत प्रकरणाचा तपास करीत होते.

# नगराध्यक्षपदासाठी १२७ तर सदस्यपदासाठी १८२१ अर्ज दाखल




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**
अमरावती जिल्ह्यातील दहा नगर परिषद व दोन नगर पंचायतच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या नामनिर्देशपत्र दाखल करावयाच्या अखेरच्या दिवशी सोमवारपर्यंत (ता. १७) संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे नगराध्यक्ष पदासाठी एकूण १२७ तर सदस्य पदाकरीता एकूण १८२१ अर्ज दाखल झाले.

नगराध्यक्ष व सदस्य पदाकरीता (कंसात) नगरपरिषद, नगरपंचायतनिहाय नामनिर्देशनपत्रांची संख्या अचलपूर २२ (३७४), अंजनगावसुर्जी १४ (३०९), दर्यापूर ७(१३९), वरूड १४ (१५५), चांदूररेल्वे ६ (१०९), चिखलदरा ५ (५९), चांदूरबाजार १० (११६), शेंदुरजनाघाट ६ (१०४), धामणगावरेल्वे ३ (५७), मोर्शी १३ (१८२), नांदगाव खंडेश्वर ११ (८७), धारणी १६ (१३०), असे नगराध्यक्षपदासाठी एकूण १२७व सदस्य पदाकरीता १८२१ नामनिर्दे शनपत्र दाखल झालेले आहेत.

# गोपीनाथ रेड्डी कंपनीची हायकोर्टात धाव
# कोर्टाच्या अधीन सफाई कंत्राटाचा निर्णय

## नागपूर न्यायालयालयाची मनपाला नोटीस, दोन आठवड्यात उत्तर सादर करण्याचे निर्देश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती,**
प्रतीस्पर्धी कंपनीने न्यायालयात धाव घेतल्यामुळे अमरावती मनपातील सफाईचे कंत्राट न्यायालयीन निर्णयाच्या अधीन झाले आहे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने निविदा प्रक्रियेच्या पात्रतेची अटी पूर्ण न केल्याचा आरोप याचिकेमधून करण्यात आला आहे. नागपूर उच्च न्यायालयाने याप्रकरणी मनपाला नोटीस बजावली असून, दोन आठवड्यात उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. सफाईचे कंत्राट मिळवण्याच्या स्पर्धेत असलेल्या कर्नाटकच्या पी गोपीनाथ रेड्डीकंपनीने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठापुढे याचिका दाखल केली आहे. सफाईचे कंत्राट मिळवण्यासाठी निविदा दाखल केलेल्या कोणार्क इन्फ्रास्टक्चर आणि अर्बन इनवायरो सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट या दोन प्रमुख कंपन्यांनी निविदा प्रक्रियेची पात्रता पूर्ण न केल्याचा आरोप याचिकेमधून करण्यात आला आहे. निविदा प्रक्रि येला स्थगिती देण्याची विनंतीही याचिकेमधून करण्यात आली आहे. न्यायालयाने मनपाला दोन आठवड्यात बाजूबाजू मांडण्याचे निर्देश दिले आहेत. अमरावती मनपातील सफाईचे कंत्राट घेण्यासाठी तिन कंपन्या मैदानात उतरल्या होत्या. त्यामध्ये कोणार्क इन्फ्रास्टक्चर, अर्बन एनवायरो सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट आणि पी गोपीनाथ रेड्डी यांचा समावेश होता. यापैकी सर्वाधिक कमी रक्कमेचीनिविदा असलेल्या कोणार्कलावर्क ऑर्डर जारीकरण्याची प्रक्रिया केली जाणार होती. त्याआधीचपीगोपीनाथ रेड्डी कंपनीने स्पर्धेतील अन्यदोन कंपन्यांच्याविरोधात नागपूर उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या कंपन्यांनी निविदाप्रक्रियेची पात्रता पूर्ण न केल्याचा आरोप केला आहे. या याचिकेवर न्यायालयाने मनपा प्रशासनाला नोटीस बजावली असून, दोन आठवड्यात उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

# दुबई येथे महाराष्ट्रातील वारकऱ्यांनी संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा साजरा केला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अकोट:**
महाराष्ट्रातील संत ज्ञानेश्वर महाराजांचा ७२९ वा संजीवन समाधी सोहळा दुबई येथील विदेशात १७ नोव्हेंबर रोजी भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.हा सोहळा कार्तिकी वद्य त्रयोदशीच्या तिथीला आली असल्याने महाराष्ट्रातील वारकरी भावी भक्त हे दुबई दौऱ्यावर होते या ठिकाणी ह भ प गणेश महाराज शेटे यांच्या हस्ते संत ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर संत गजानन महाराजांच्या विजय ग्रंथ व प्रतिमा पूजन करण्यात आले

याप्रसंगी भाविक भक्तांनी आरती केली त्यानंतर प्रा. माया म्हैसने यांनी पसायदान म्हटले. महाराष्ट्रातील वारकरी हे जगात कुठेही असले तरी संत ज्ञानेश्वर महाराजांनी शिकवण दिलेल्या हे विश्वचि माझे घर या ओळीप्रमाणे भावी भक्तांनी विदेशात आपल्या अध्यात्म व संस्कृतीचे जतन करीत वारकरी पोशाखात हा समाधी सोहळा साजरा केला

या सोहळ्याला महाराष्ट्रातीलच नव्हे तर विदेशी पर्यटकांनी सुद्धा हजेरी लावली होती त्यांनी सुद्धा संत ज्ञानेश्वर महाराजांचे दर्शन घेतले त्यामुळे हा संजीवनी सोहळा लक्षवेधी ठरला होता. या सोहळ्याला मोठ्या प्रमाणावर भावीकभक्त उपस्थित होते. ह भ प गणेश महाराज शेटे हे परमहंस आंतरराष्ट्रीय यात्रा कंपनीच्या माध्यमातून चारधाम सह भाविक भक्तांना विजय दौराकडून आणतात एवढ्या दौरा दुबईतील विदेशात असल्यामुळे त्यांनी या समाधी सोहळ्याचे खास आयोजन केले होते

# संगाबा अमरावती विद्यापीठ निवडणुकांमुळे परीक्षा पुढे ढकलल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी - २०२५ लेखी परीक्षेची वेळापत्रके विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत, १ ते ३ डिसेंबर, २०२५ दरम्यान महाराष्ट्र राज्यातील नगरपरिषदा, नगरपंचायतीच्या होणाऱ्या निवडणुकांमुळे १ ते ३ डिसेंबर दरम्यानच्या सर्व लेखी परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहेत. १ डिसेंबर रोजीची परीक्षा ही २० डिसेंबर, २०२५ रोजी होईल. २ डिसेंबर रोजीची परीक्षा ही २२ डिसेंबर व ३ डिसेंबर रोजीची परीक्षा ही २३ डिसेंबर, २०२५ रोजी यापूर्वीच निश्चित करण्यात आलेल्या परीक्षा केंद्र व दिलेल्या वेळेवर घेण्यात येईल, असे परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून कळविण्यात आले आहे. यासंदर्भात सर्व प्राचार्य, केंद्राधिकारी, संबंधित महाविद्यालये, परीक्षा केंद्र यांना पत्राव्दारे परीक्षा विभागाकडून कळविण्यात आले असून, संबंधितांनी याची सर्व विद्यार्थ्यांनाजाणीव करुन द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.नितीन कोळी यांनी केले आहे.

# निवडणूक निरीक्षकांनी दर्यापुरात आचारसंहितेचा घेतला आढावा

## स्थानिक नगरपालिका निवडणुकीच्या तयारीची केली पाहणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८दर्यापूर-** विभागीय आयुक्तांच्या आदेशानुसार, निवडणूक निरीक्षक प्रमोद दंडोले यांनी दर्यापूर शहराला भेट देऊन स्थानिक नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहितेचा आढावा घेतला. त्यांनी निवडणुकीच्या तयारीचा आणि कामकाजाचा सखोल अभ्यास केला.

या भेटीदरम्यान, दंडोले यांनी निवडणुकीची सुरक्षा व्यवस्था, आवश्यक मनुष्यबळ आणि एकूण नियोजनाची पाहणी केली. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून निवडणुकीचे कामकाज व्यवस्थित पार पाडण्यासाठी मार्गदर्शन केले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी दादासाहेब दराडे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. रवींद्रकुमार कानडजे, मुख्याधिकारी डॉ. विकास खंडारे, दर्यापूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी सतीश कुलकर्णी, ठाणेदार सुनील वानखडे आणि सीडीपीओ अमोल मेरगळ यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

निवडणूक निरीक्षक प्रमोद दंडोले यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना निर्देश दिले की, आगामी नगरपालिका निवडणूक निर्भय, निःपक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्वांनी सज्ज राहावे.

# सीईओ संजीता महापात्रांनी दिव्यांग जागृती रथाला दाखवली हिरवी झेंडी

## चांदूरबाजार तालुक्यात विविध विभागांच्या कामकाजाचा घेतला आढावा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८चांदुर बाजार-**
जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) संजीता महापात्रा यांनी नुकतीच चांदूरबाजार तालुक्याला भेट दिली. या भेटीदरम्यान, त्यांनी पंचायत समिती, ग्रामपंचायत आणि शिक्षण विभागाच्या कामकाजाचा आढावा घेतला. तसेच, स्थानिक पंचायत समितीने सुरू केलेल्या दिव्यांग जागृती रथाला हिरवी झेंडी दाखवून या मोहिमेचा शुभारंभ केला.

हा रथ ग्रामीण भागातील सर्व गावे आणि शाळांमध्ये जाऊन दिव्यांगांसह नागरिकांमध्ये सामाजिक जागृती निर्माण करेल. समाजात आजही दिव्यांगांबद्दल अनेक समज-गैरसमज आहेत. तसेच, काही शालेय विद्यार्थ्यांना किंवा त्यांच्या पालकांना त्यांच्या अल्पशा दिव्यांगत्वाची जाणीव नसते, ज्यामुळे ते शासनाच्या मदतीपासून वंचित राहतात. ही मोहीम याच उद्देशाने हाती घेण्यात आली आहे.

शासनाने दिव्यांगत्वाचे २१ प्रकार निश्चित केले आहेत. यामध्ये अंधत्व, अंशतः अंधत्व, कर्णबधिर, वाचा दोष, अस्थिव्यंग, मानसिक आजार, अध्ययन अक्षमता, मेंदूचा पक्षाघात, स्वमग्नता, बहुविकलांग, कुष्ठरोग, बुटकेपणा, बौद्धिक अक्षमता, अविकसित मांसपेशी, मज्जा संस्थेतील आजार, मल्टीपल स्क्लेरोसिस, थॅलेसेमिया, हिमोफिलिया, सिकलसेल, सिड हल्लाग्रस्त पीडित आणि कंपवात रोग यांचा समावेश आहे.

या रथाचा मुख्य उद्देश या २१ प्रकारच्या दिव्यांगत्वाबाबत जनजागृती करणे, दिव्यांगांचा शोध घेणे, त्यांना योग्य औषधोपचार, आवश्यक सुविधा आणि शासकीय मदत पोहोचवणे हा आहे.

याच भेटीदरम्यान, सीईओ महापात्रा यांच्या हस्ते राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी उपक्रम, मुख्यमंत्री ग्राम समृद्धी पंचायत अभियानाचाही शुभारंभ करण्यात आला. त्यांनी तालुक्यातील शिरजगाव बंड, बेलोरा आणि चिंचोली काळे या गावांना भेटी देऊन नागरिक, शाळा आणि अंगणवाडीमधील विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

पंचायत समितीच्या सभागृहात त्यांनी सरपंच, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक आणि पंचायत समिती अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेतली. या बैठकीत नागपूर जिल्ह्यातील सातनवारी ग्रामपंचायतीप्रमाणे डिजिटल कामकाजाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. चांदूरबाजार तालुक्यातील २३ ग्रामपंचायती आता डिजिटल झाल्या आहेत.

या संपूर्ण दिवसाच्या दौऱ्यात त्यांच्यासोबत गट विकास अधिकारी, सहाय्यक गटविकास अधिकारी गणेश घोगरकर, गट शिक्षण अधिकारी कुचे, पंचायत विस्तार अधिकारी रामेश्वर रामागडे, सुरेश लांडगे, बांधकाम अभियंता राजेश अडगोकार, निखिल नागे, राजकुमार वसुले, सरपंच भैय्यासाहेब कडू, अरुणा काळे, नंदा वाकोडे, उमेदचे सागर वानखेडे, सुभाष तांबे, अरविंद मून यांच्यासह पंचायत समितीचे अधिकारी, कर्मचारी आणि गट साधन केंद्राच्या महिला शिक्षिका उपस्थित होत्या.

# शासनाचे स्वयंचलित हवामान केंद्र शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी की विमा कंपनीच्या?

## हिवरखेड महसूल मंडळातील स्वयंचलित हवामान केंद्र ८ दिवसात स्थलांतरित करा! राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा आंदोलनाचा ईशारा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मोर्शी**

शेतक-यांना हवामानाचा अचूक अंदाज मिळावा व वातावरणातील बदलामुळे होणारे शेतीचे संभाव्य नुकसान टाळता यावे, या उद्देशाने शासनाच्या वतीने स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने मोर्शी तालुक्यातील हिवरखेड महसूल मंडळात स्वयंचलित हवामान केंद्र सुरू करण्यात आले आहे. परंतु हिवरखेड मंडळातील स्वयंचलीत हवामान केंद्र मंडळाच्या मध्यभागी दापोरी येथे न बसविता मोर्शी तालुक्यातील अखेरच्या टोकाला बसविल्यामुळे हिवरखेड मंडळातील फळ पीक विमा काढलेल्या हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना फळ पीक विमा मदतीपासून वंचित राहण्याची वेळ येत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांनी केला आहे.मात्र हिवरखेड मंडळामध्ये उमरखेड येथील फळरोप वाटिकेमध्ये बसविलेल्या हवामान केंद्राच्या परिसरामध्ये संत्रा झाडांची लागवड केलेली असून तेथील संपूर्ण परिसर ओलिताखाली राहत असल्यामुळे कमी तापमान जास्त तापमानाची योग्य नोंद होऊ शकत नसल्यामुळे हजारो संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना फळ पीक विम्याच्या मदतीपासून वंचित राहण्याची वेळ हिवरखेड महसूल मंडळातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांवर येत आहे. त्यामुळे विमा कंपनीचा कोट्यावधी रुपयांचा फायदा होत असल्याचे निदर्शनास येत असून स्वयंचलित हवामान केंद्र विमा कंपनीच्या फायद्यासाठी आहे की शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी हे कळायला मार्ग नाही.

हिवरखेड मंडळातील स्वयंचलित हवामान केंद्र ८ दिवसामध्ये दापोरी परिसरामध्ये बसवून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळऊन द्यावा अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते, उपविभागीय कृषी अधिकारी उज्वल आगरकर, तालुका कृषी अधिकारी पुरुषोत्तम माने यांना निवेदन देऊन देण्यात आला.

### स्वयंचलित हवामान केंद्र कुणाच्या फायद्यासाठी ?



शेतकऱ्यांना हवामानाचा अचूक अंदाज मिळावा आणि शेतीचे संभाव्य नुकसान टळावे, या उद्देशाने उभारलेल्या स्वयंचलित हवामान केंद्रांची स्थिती गंज चढल्यागत झाली आहे. ग्रामीण भागातील मंडळ कार्यालयांतर्गत उभारलेल्या या हवामान केंद्रांच्या परिसरात मोठ्या प्रमाणात झुडपे वाढली आहेत.हवामानाची नोंद घेणारे काही यंत्रे झुडपामध्ये झाकून गेली असून हवामान केंद्र चुकीच्या ठिकाणी बसविल्यामुळे हवामानाची अचूक नोंद होणार कशी? याबाबत संत्रा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. या गंभीर प्रकारामुळे फळ पीक विमा धारक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असुन विमा कंपनीचा कोट्यावधी रुपयांचा फायदा होतांना दिसत आहे.

**रुपेश वाळके**
**अध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्ष मोर्शी तालुका.**

# डॉ. नीता कचवे यांच्या हस्ते जागर माय मराठीचा काव्य सोहळ्याचा दिमाखदार शुभारंभ



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८नागपूर**

जागर माय मराठीचा या राज्यस्तरीय कविसंमेलनाचा भव्य शुभारंभ धनवटे नॅशनल कॉलेजच्या सुसज्ज प्रांगणात बांधिलकी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा डॉ. नीता कचवे यांच्या हस्ते झाला. चारोळी मंच, पुणे यांच्या वतीने आयोजित या संमेलनाचे अध्यक्षस्थान सुप्रसिद्ध साहित्यिक चंद्रकांत वानखेडे यांनी भूषविले. प्राचार्य डॉ. प्रशांत कोठे यांनी स्वागताध्यक्ष म्हणून काम पाहिले.राज्यभरातून आलेल्या सुमारे सत्तर कवी-कवयित्रींनी एकापेक्षा एक सरस कविता, गजल व चारोळ्यांनी रसिकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. ज्येष्ठ साहित्यिक प्रभाकर तांडेकर, डॉ. प्रणव कोलते, तुकाराम कांबळे यांसह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत या काव्यमहोत्सवाला रंगत आली. साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल दैनिक दिव्य वतनचे संपादक गोपाल कडूकर, कवी सुभाष मानवटकर आणि प्रवीण आडेकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला.यावेळी कविवर्य चंद्रकांत वानखेडे यांच्या मृद्गंध या काव्यसंग्रहाचे तसेच कवी रामदेव सित्रे यांच्या माणसातला देवमाणूस या काव्यसंग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. माय मराठीचा जागर देश-विदेशात व्हावा, असा भावपूर्ण संदेश अध्यक्षीय भाषणातून देण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी राजेश माहूरकर, हितेश गोमासे व राहुल गवस यांनी केले. संमेलनाच्या यशस्वीतेसाठी धनवटे कॉलेजच्या प्राध्यापकांसह अनेक स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

# अपघातांची मालिका नागरिकांमध्ये संताप

## तिवसा तालुक्यातील विध्यार्थ्यांची गतिरोधक ची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि १८तिवसा**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहा वरील तिवसा हे तालुक्याचे प्रमुख ठिकाण असून येथे दररोज हजारो नागरिकांची वर्दळ असते. बस स्थानक परिसर, महाविद्यालये, शाळा, प्रशासकीय कार्यालये तसेच व्यापारी भाग, बाजारपेठ यामुळे या सर्विस रोडवरील वाहतूक सतत गजबजलेली असते. मात्र या महत्त्वाच्या चौकामध्ये स्पीड ब्रेकर, सूचनाफलक, दिशादर्शक फलक व रिफ्लेक्टर नसल्याने अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे.गेल्या अनेक वर्षांपासून तिवसा बस स्थानक, महाविद्यालय प्रशासन तसेच विविध सामाजिक संघटनांनी आयआरबी इन्फ्रास्ट्रक्चर व राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे (छक-ख) लेखी निवेदने पत्रव्यवहार करून स्पीड ब्रेकर, रिफ्लेक्टर व वाहतूक सुरक्षाविषयक सुविधा तातडीने बसविण्याची मागणी केली आहे. मात्र या तक्रारींना आजवर कोणतीही दखल न घेतल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे.तिवसा बसस्थानक समोरील रोडवर, पंचायत समिती चौक, पेट्रोल पंप चौक, पंचवटी चौक, स्टेट बँक चौक तसेच शहरातील सर्विस रोडवर कुठेही स्पीड ब्रेकर किंवा सूचनाफलक नसल्याने वाहनधारकांचा वेग मर्यादेबाहेर जात असून पादचाऱ्यांसाठी सतत जीवघेणी स्थिती निर्माण होते. नुकत्याच घडलेल्या अपघातात एका ज्येष्ठ नागरिकांचा मृत्यू झाला असून इतर अनेक लहान-मोठे अपघात या परिसरात नियमित घडत असतात. बसस्थानक परिसरात दिवसाला किमान दोन ते तीन हजार लोकांची ये-जा होत असून सुरक्षा उपायांशिवाय हा जनसमुदाय कायम धोक्यात असल्याचे चित्र दिसते.तिवसातील वाढत्या अपघातांचा वेग कमी करण्यासाठी संबंधित विभागाने त्वरित स्पीड ब्रेकर, रिफ्लेक्टर, दिशादर्शक फलक व सूचनाफलक बसविणे अत्यंत आवश्यक आहे. या उपाययोजनांमुळे पादचाऱ्यांचा जीव वाचेल तसेच वाहतूक शिस्तीत येण्यास मदत होईल.

**नागरिकांमध्ये तीव्र नाराजी**

लोकप्रतिनिधींनी हस्तक्षेपाची मागणीनागरिक, बसस्थानक प्रमुख, विविध संघटना, तसेच महाविद्यालय व शाळा प्राचार्यांनी दिलेल्या निवेदनांनंतरही आयआरबी प्रशासनाने या प्रश्नाकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप केला जात आहे. नागरिकांकडून स्थानिक लोकप्रतिनिधींनी तातडीने पुढाकार घेऊन आयआरबी व राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाशी चर्चा करून या चौकांमध्ये आवश्यक सुरक्षा सुविधा तात्काळ उपलब्ध करून द्याव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.




तिवसा शहरात नेहमीच वाढणारे अपघात पाहून मन सुन्न होते. इतकी वर्षे मागणी करूनही स्पीड ब्रेकर व सूचनाफलक न बसविणे म्हणजे नागरिकांच्या सुरक्षेशी केलेला थेट खेळ आहे. आयआरबी आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने याकडे केलेले दुर्लक्ष अक्षम्य आहे. बसस्थानकापासून प्रमुख चौकांपर्यंत रोज हजारो नागरिक जीव मुठीत घेऊन रस्ता ओलांडतात. त्वरित उपाययोजना न झाल्यास आम्ही नागरिकांसह रस्त्यावर उतरून आंदोलन करू.

**योगेश वानखडे**
**माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक तिवसा**

दररोज रस्ता ओलांडताना भीती वाटते. स्पीड ब्रेकर, रिफ्लेक्टर आणि फलक नसल्याने येणारी वाहने वेगात समोर येतात. शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक, महिलांसाठी हा मार्ग अत्यंत धोकादायक झाला आहे. अनेकांनी अनेकदा निवेदनं दिल्यानंतरही आय आर बी कडून कानाडोळा केला जात आहे. एखाद्या मोठ्या दुर्घटनेची वाट का पाहायची? तात्काळ सुरक्षा उपाययोजना न झाल्यास नागरिकांनाच रस्त्यावर उतरावे लागेल.

**पिंटू उर्फ बाबा बनसोड नागरिक, तिवसा**

मागील वर्षी मी स्वतः शहरातील सर्व शाळा महाविद्यालय यांच्या सोबत संयुक्तरित्या एन एच आर आय कार्यालय यांना तिवसा बसस्थानका समोर तातडीने गतिरोधक बसवण्याबाबत पत्रव्यवहार केले व प्रत्यक्ष त्यांच्या कार्यालयास भेट दिली व बसस्थानक परिसरा बाबत अवगत केले या ठिकाणी गतिरोधक अती आवश्यक आहे कारण मोठ्या प्रमाणात विद्यार्थी वृद्ध अपंग व इतर प्रवासी मोठ्या प्रमाणात ये_जा करत असतात. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात छोट्या व मोठ्या गाड्या अती भरधाव वेगाने धावत असतात...या ठिकाणी मोठे व किरकोळ अपघात होतच असतात तरीसुद्धा अजून पर्यंत स्पीड ब्रेकर बसवण्यात आले नाही सदर कंपनी याबाबत गांभीर नाही.

**प्रतिक मोहोड तिवसा बसस्थानक प्रमुख**

# बालिकेवरील अत्याचार व हत्येचा शोकांतिका

## अमरातीत सोनार समाजाचे प्रशासनाला निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

मौजे डोंगराळ (ता. मालेगाव, जि. नाशिक) येथे चार वर्षांच्या कु. प्रज्ञा जगदिश दुसाने या निरागस बालिकेवर झालेल्या अमानुष लैंगिक अत्याचारानंतर झालेल्या खूनप्रकरणाने संपूर्ण राज्य हादरले आहे. या जघन्य प्रकारामुळे केवळ सोनार समाजातच नव्हे तर सर्व समाजघटकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्यातील समस्त सोनार समाजबांधवांकडून संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात अत्याचार व हत्येचा घोर प्रकार करणाऱ्या आरोपीला कठोरात कठोर शिक्षा फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.तसेच पिडीत बालिकेच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी शासनाकडून तातडीने सर्वतोपरी मदत उपलब्ध करून देण्याची मागणीही समाजबांधवांनी केली आहे. या प्रकरणात तत्काळ आणि निष्पक्ष कारवाई व्हावी, यासाठी निवेदनाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे.

सर्व सोनार समाजाच्या समाज बांधवांनी या घटनेचा जाहीर निषेध केला यावेळी श्री नरहरी माळवी सोनार संघाचे अध्यक्ष राजेश अनासाने, उपाध्यक्ष डॉ विनोद गुहे, राजेंद्र धरमठोक ,सचिव प्रा. रवींद्र प्रांजळे ,कोषाध्यक्ष नितीन खांडेकर ,सहसचिव मंगेश नेरेकर, अमरावती जिल्हा सुवर्णकार संघाचे सराफा अध्यक्ष अजय तीनखेडे निलेश मरोडकर वैश्य सोनार संघटनेचे दिलीप दाभाडे प्रकाशराव तारेकर नंदकिशोर गुंबळे अरविंद विंचुरकर विनायकराव चेडे नारायणराव नेरकर किरण विंचुरकर नितीन शेरेकर नरेंद्र शेरेकर निलेश गुहे अशोकराव विंचुरक अरुणराव मांडळे दिनेश परांजपे प्रमोद तारेकर सुनील शिराळेकर गजानन नांदुरकर संजय भुताड नितीन तारेकर मुकुंदा आनासाने राजेंद्र बिजागरे अनिल अनासाने अनिल खडेकर संतोष पाचकवडे सागर बुटे महेश अश्टूनकर दीपक पोहेकार राजेंद्र बिंड जयंत राउळकर राजेंद्र बहाड नरेंद्र पाटणे चेतन मालोकर ज्ञानेश्वर हिरुडकर श्याम मानेकर गोपाळराव हिरुळकर हरीश सोनी दिनेश ढोमणे अनंत पाटणे अमोल अनासाने मुकेश अनासाने संजय माथने मनोज सावरकर भुषण पाटणे, महिला आघाडी मध्ये जोशना हिरुळकर प्राजक्ता बानूवाकोडे अनिता अनासाने अर्चना खांडेकर पल्लवी अनासाने मयुरी पाटणे आरती बैतुले विना हिरूळकर प्रीती बुटे स्वाती अस्तुलकर अपर्णा हाडे यांच्यासह समस्त सोनार समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसेना (एकनाथ शिंदे गट) स्टार प्रचारक म्हणून प्रिती संजय बंड यांची नियुक्ती




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८ अमरावती**

आगामी नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर शिवसेना (एकनाथ शिंदे गट) यांनी आपल्या स्टार प्रचारकांची अधिकृत यादी जाहीर केली असून, उपनेत्या प्रिती संजय बंड यांची स्टार प्रचारक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

शिवसेना मुख्य नेते व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार ही घोषणा करण्यात आली.पक्षाच्या धोरणांची जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे आणि निवडणूक प्रचाराला योग्य दिशा देणे यासाठी स्टार प्रचारकांची निवड करण्यात आली आहे. महिला नेतृत्व मजबूत करण्याच्या उद्देशाने प्रिती संजय बंड यांची निवड महत्त्वपूर्ण मानली जात आहे. स्थानिक पातळीवरील त्यांचे सामाजिक योगदान आणि शिवसेनेप्रती निष्ठा लक्षात घेऊन त्यांना ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.या नियुक्तीचे पत्र शिवसेना सचिव संजय भाऊराव मोरे यांनी प्रदान केले. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या प्रचार रणनीतीत प्रिती बंड यांचा सक्रीय सहभाग महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे पक्षातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# अमरावतीत Plastic Surgery in Day-to-Day Practice विशेष व्याख्यानास उत्स्फूर्त प्रतिसाद



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (निमा), अमरावती शाखेतर्फे Plastic Surgery in Day-to-Day Practice या विषयावरील विशेष वैज्ञानिक व्याख्यानाचे आयोजन रविवारी, १६ नोव्हेंबर रोजी हॉटेल रांगोली पर्ल, नवाथे स्केअर येथे करण्यात आले. सायंकाळी ७ वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमाला वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ आणि डॉक्टरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या व्याख्यानाचे प्रमुख वक्ते डॉ. तक्षक देशमुख (M.B.B.S., MS - General Surgery, DNB - Plastic Surgery, नवी दिल्ली) होते. त्यांनी प्लास्टिक सर्जरीची दैनंदिन प्रॅक्टिसमध्ये वाढती उपयुक्तता, उपचारातील आधुनिक तंत्रज्ञानाची भूमिका आणि रुग्णसेवेतील नवनवीन शक्यता यावर सविस्तर मार्गदर्शन केले. निमा अमरावतीचे अध्यक्ष डॉ. प्रवीण औगड यांनी आंतरविद्याशाखीय शैक्षणिक उपक्रमांची गरज अधोरेखित केली.कार्यक्रमात राष्ट्रीय निमा सहसचिव डॉ. विजय अजमिरे, प्रदेशाध्यक्ष डॉ. अमोल ठवली, सचिव डॉ. पंकज कावरे, तसेच महिला मंच अध्यक्षा डॉ. प्रेमा चौधरी यांची उपस्थिती लाभली. डॉ. प्रतिक्षा पारीकर यांनी कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन केले, तर डॉ. अनुराधा उभाळे यांनी धन्वंतरी स्तवन सादर केले.यावेळी नव्याने निवडलेल्या निमा स्टुडंट्स फोरमच्या सदस्यांचीही ओळख करून देण्यात आली. नितीन नंदरधने यांच्या आभारप्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. अमरावती निमा शाखेच्या शैक्षणिक बांधिलकीचा हा उपक्रम आणखी एक यशस्वी टप्पा ठरला.

# कोल्हापुरी बंधाऱ्याच्या लोखंडी प्लेटा व अप्पर वर्धातील पाईप चोरी प्रकरण उघड; मोर्शी पोलिसांची दोन चोरट्यांना अटक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मोर्शी**

मोर्शी तालुक्यातील दोन वेगवेगळ्या ठिकाणांहून लोखंडी साहित्य चोरी करणाऱ्या दोन चोरट्यांना मोर्शी पोलिसांनी अटक करून ४६ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात यश मिळवले आहे.

दिनांक ०३ सप्टेंबर २०२५ रोजी ग्राम मनिमपूर शेतशिवारातील शासकीय कोल्हापुरी बंधाऱ्यावरील ०७ नग लोखंडी प्लेटा चोरीला गेल्याची फिर्याद नोंद झाल्यावरून पोलीस स्टेशन मोर्शी येथे अप. क्र. ४९७/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.तसेच दिनांक १२ जुलै २०२५ रोजी अप्पर वर्धा पाटबंधारे उपविभाग, मोर्शी यांच्या वसाहतीतून लोखंडी पाईप व इतर साहित्य चोरीला गेले होते. या प्रकरणी अप. क्र. ३७२/२०२५ कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता.दोन्ही गुन्ह्यांचा समांतर तपास करत असताना गुन्हे प्रकटीकरण पथकाला गोपनीय माहिती मिळाल्याने आरोपी राधेश्याम उर्फ ज्ञानेश्वर मोहन धुर्वे (वय ४०, रा. गधेघाटपुरा, मोर्शी) याच्या घरावर दोन पंचासमक्ष झडती घेण्यात आली. त्यावेळी लाकडाखाली लपवलेली कोल्हापुरी बंधाऱ्याची चोरीस गेलेली ०७ लोखंडी प्लेटा आढळून आल्या.विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने आपल्या साथीदारासह- चरणदास भिमराव गाडे (वय ३८, रा. गाडगेनगर, मोर्शी)-मनिमपूर येथून प्लेटा चोरल्याची कबुली दिली. तसेच जुलै २०२५ मध्ये दोघांनी मिळून अप्परवर्धा कॉलनीतून लोखंडी पाईप चोरी केल्याचेही उघड केले.

पोलिसांनी या दोन्ही गुन्ह्यांतील एकूण ४६,०००/- किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# दोन्ही मुहूर्त साधावे लागणार; विवाह सोहळे व निवडणूक एकाच दिवशी

## प्रशासनाची 'आधी मतदान, मग लग्न'ची हाक जनजागृतीची आहे गरज

अरुण जोशी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**

नगरपरिषद नगरपंचायत निवडणुकीचा बिगुल वाजला असून, २ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पहाणार आहे. मात्र याच दिवशी विवाहाचा शुभमुहुर्त असल्याने मतदानाच्या टक्केवारीवर याचा परिणाम होणार का, याबाबत जनमानसात चर्चा सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासन आणि निवडणूक विभागाने जनजागृतीची गती वाढविण्याची गरज व्यक्त केली आहे.

आधी मतदान, नंतर लग्न' असा संदेश देत व्यापक जनजागृती केल्यास मतदारांचा उत्साह वाढू शकतो, असे निवडणूक विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले. मतदान हा लोकशाहीचा सर्वांत मोठा उत्सव असल्याने नागरिकांनी प्रथम मतदानाचे कर्तव्य बजताते आणि त्यानंतर विवाह सोहळ्यांना उपस्थित राहाते, असे आवाहनही प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

**प्रशासनाचा संदेश**

प्रशासनाने स्पष्ट केले आहे की मतदान हा लोकशाहीचा सण असून प्रत्येक नागरिकाने हा सण साजरा करणे आवस्यक आहे. नागरी कर्तव्य म्हणजे फक्त मतदानाचा हक्क बजावणे हे तर जबाबदारीने मतदान करून प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदविणे आहे मतदारांना मतदान करण्यावेच नव्हे, तर इतरांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन केले आहे.

**लग्नसमारंभांमुळे मतदानात घट होण्याची भीती !**

स्थानिक विवाह मंडळे आणि हॉल व्यावसायिकांच्या माहितीनुसार, २ डिसेंबर रोजी हंगामातील सर्वाधिक मागणी असलेला शुभ दिवस आहे. त्यामुळे अनेक कुटुंबे विवाहासाठी गावाबाहेर जाणार आहेत. नातेवाइकांच्या लग्नांसाठी होणारी धावपळ, पाहुण्यांची व्यवस्था, वऱ्हाडींची गर्दी आणि समारंभाची तयारी यामुळे अनेकांना मतदानासाठी वेळ काढणे कठीण ठरू शकते, असे सांगितले जात आहे.

**विवाह आयोजकांचा सहभागही महत्त्वाचा !**

विवाह आयोजकांनी पाहुण्यांना मतदान करूनच समारंभाना उपस्थित राहण्याचे आवाहन करणे गरजेचे असल्याचे प्रशासनाचे मत आहे. सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवी गट आणि प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नांनी २ डिसेंबर रोजी लग्नाचा शुभमुहूर्त असूनही मतदानाचा टक्का वाढेल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# नगरपालिका की 'कुटुंबपालिका'?, सगेसोयरे आणि नातेवाईकांना उमेदवारी

## जिल्ह्यात अनेक नेत्यांच्या नातेवाईकांनाच उमेदवारी बहाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक ही कार्यकर्त्यांची निवडणूक आहे. कुणी नेता असल्याने त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना किंवा पत्नीला तिकीट मिळणार नाही. जर त्यांनी ५१ टक्के मतांची हमी दिली तरच पक्ष त्यांना तिकीट देईल, असे जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी निवडणुकीपूर्वी स्पष्टपणे जाहीर केले, पण अखेरीस जिल्ह्यात अनेक नेत्यांच्या नातेवाईकांनाच उमेदवारी बहाल करण्याची वेळ भाजपवर आली.



अमरावती जिल्ह्यात दहा नगरपालिका आणि दोन नगरपंचायतींच्या निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरूवात झाली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडणुकीतील चित्र स्पष्ट होणार आहे. बहुतांश ठिकाणी सर्वच पक्ष स्वबळावर निवडणूक लढवीत असल्याने चूरस निर्माण झाली आहे. त्यातच काही स्थानिक आमदारांनी कुटुंबातील सदस्यांना उमेदवारी मिळवून देण्यात धन्यता मानल्याने इतर इच्छूक उमेदवारांमध्ये नाराजीची भावना निर्माण झाली आहे. त्याचे बंडखोरीत रुपांतर होण्याची शक्यता आहे. आमदारकी मिळवल्यानंतर नगराध्यक्षपदही घरातच येणार की मतदार त्यांना धक्का देणार, हे येत्या ३ डिसेंबर रोजी निवडणूक निकालानंतर स्पष्ट होणार आहे.

धामणगाव रेल्वे मतदारसंघाचे भाजपचे आमदार प्रताप अडसड हे नऊ वर्षांपुर्वी धामणगावचे नगराध्यक्ष म्हणून निवडून आले होते. नंतर ते आमदार झाले. आता नगराध्यक्षपदासाठी त्यांच्या भगिनी अर्चना रोठे-अडसड या उमेदवार आहेत. याआधी १९८५ ते १९९० पर्यंत भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार अरूण अडसड यांनी धामणगावचे नगराध्यक्षपद भुषवले आहे. अडसड कुटुंबामधील नगराध्यक्षपद सांभाळण्याची परंपरा यावेळीही कायम राहणार की, मतदार वेगळा कौल देणार हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

दर्यापूर नगरपालिकेत भाजपचे अकोटचे आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या पत्नी नलिनी भारसाकळे या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार आहेत. गेल्या निवडणुकीत देखील त्या निवडून आल्या होत्या. यावेळी नगराध्यक्षपदासाठी भाजपमधून अनेक जण इच्छूक होते, पण प्रकाश भारसाकळे यांनी आपल्या प्रभावाचा वापर केल्याचे चित्र दिसून आले.

दर्यापूरचे शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे आमदार गजानन लवटे यांनी त्यांचे पुत्र यश लवटे यांच्यासाठी अंजनगाव सुर्जी नगराध्यक्षपदाची उमेदवारी खेचून आणली आहे. दुसरीकडे, चिखलदरा नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ आल्हाद कलोती यांनी नगरसेवकपदासाठी भाजपतर्फे उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. भाजपतर्फे आल्हाद कलोती हे नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करणार होते. चिखलदरा येथील पक्षांतर्गत बैठकीत त्यांचे नाव देखील पुढे आले होते, पण राष्ट्रवादी अजित पवार गटाचे राजेंद्रसिंह सोमवंशी यांना भाजपमध्ये आणून त्यांना नगराध्यक्षपदाची उमेदवारी देण्यात आली.

# गोपाल नगर (D-Mart) चौकातील वाहतूक कोंडी वाढली

## सिग्नल सुरू करण्याची हेल्पिंग हॅण्ड संस्थेची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

गोपाल नगर (डि-मार्ट) चौक परिसरात दोन मोठे मॉल, रेल्वे क्रॉसिंग आणि वाढलेली लोकसंख्या यामुळे वाहतूक कोंडी तीव्र झाली असून यावर तातडीने उपाययोजना करण्यासाठी संबंधित चौकातील सिग्नल कार्यान्वित करण्याची मागणी 'हेल्पिंग हॅण्ड बहुदेशीय संस्था, अमरावती' यांनी पोलिस उपायुक्त (मुख्यालय) यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात वाढत असून ट्रॅफिक अमलदारांना मोठी कसरत करावी लागत आहे. अनेकदा कोंडीमुळे वाहनचालकांमध्ये वाद होण्याच्या घटनाही घडतात. परिस्थिती अधिक बिकट होऊ नये म्हणून गोपाल नगर चौकातील सिग्नल तातडीने सुरू करण्यात यावा, अशी विनंती संस्थेने केली आहे.

# नेतेमंडळी केवळ मत मागण्यासाठी येतात, मीही...

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचे स्पष्ट मत; बऱ्हाणपूर ते अमरावती मार्ग चौपदरी करण्याचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे त्यांच्या स्पष्टवक्तेपणासाठी ओळखले जातात. त्यांनी अनेकवेळा स्वपक्षीय नेत्यांवरही टीका केली आहे. सोमवारी मेळघाटमधील कोठा येथे बोलताना त्यांनी नेत्यांच्या वर्तनाबद्दल टोला लगावला. नितीन गडकरी म्हणाले, समाजातील वंचितांसाठी काम करणे अवघड आहे. त्यांची सेवा करणे हे व्रत आहे. जे लोक भौतिक सुखांचा त्याग करून सामाजिक जाणिवेतून दुःखी, पीडितांची सेवा करतात, तेच संत म्हणून ओळखावे. मेळघाटात आदिवासींची अविरत सेवा करणारे डॉ. रवींद्र कोल्हे, डॉ. स्मिता कोल्हे, निरूपमा देशपांडे, डॉ. सातव हेच खरे संत आहेत. नाहीतर नेतेमंडळी केवळ मते मागण्यासाठी येतात.



भरपूर आश्वासने देतात आणि निघून जातात. मीही मते मागतो. पण, या भागातील नागरिकांनी रस्त्याच्या दुर्दशे विषयी आपल्याला माहिती दिली आहे. मी या विषयात लक्ष घालणार आहे. बऱ्हाणपूर ते अमरावती हा मार्ग चौपदरी करण्याचा निश्चितपणे प्रयत्न करणार आहे.नितीन गडकरी म्हणाले, मेळघाटातील आदिवासींना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात आणि त्यांचा आर्थिक विकास व्हावा यासाठी विविध प्रयत्न करण्यात येत आहेत. कोठा येथील संपूर्ण बांन केंद्रात बांबूपासून विविध वस्तू तयार करण्यात ये आहेत. येत्या काळात या ठिकाणी पाच को रुपयांच्या कोसा साडी निर्मितीचा उद्योग उभारण्य येणार आहे. गडकरी म्हणाले, मेळघाटात रस्त्यांच्या प्रश्नांची पूर्ण जाण आहे. रस्त्या विकासाशिवाय या भागाचा विकास शक्य न देशातील महामार्गाचे काम एशियन बँक करीत त्यामुळे राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडू रस्त्याचे काम कशा पद्धतीने करण्यात येईल माहिती घेण्यात येईल. आदिवासींमध्ये क असून त्यास प्रशिक्षणाची जोड देणे आवशयन संपूर्ण बांबू केंद्राच्या माध्यमातून बांबूच्या सुब तयार करण्यात येत असून असून जगभरातील ६० देशांमध्ये या वस्तू पोहोचल्या आहेत. त्यामुळे ग्राहक आपल्यापर्यंत चालून आला पाहिजे, अशा वस्तू निर्मिती करण्यावर भर द्यावा. आजविविध क्षेत्रात तंत्रज्ञानाने प्रगती केली आहे. याचा उपयोगही करून घेणे आवश्यक आहे. कोशाच्या साडीला जगभरात मागणी असून यासाठी पाच कोटी रुपयांचा प्रकल्प उभारण्यात येईल. प्रकल्पासाठी आवश्यक असणारा दोन कोटी रुपयांचा स्वनिधी संस्थेसाठी देणगी देण्यात येणार आहे. यावेळी कांचन गडकरी, संपूर्ण बांबू केंद्राच्या अध्यक्ष डॉ. निरुपमा देशपांडे, योगेश बापट, डॉ. रवींद्र कोल्हे, डॉ. स्मिता कोल्हे आदी उपस्थित होते.

# एसटीचा पंचसूत्री आराखडा जाहीर; वक्तशीरपणा, सुविधा आणि कार्यक्षमता वाढणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) उत्पन्नवाढ, कार्यक्षमता आणि प्रवासी सुविधांच्या उन्नतीसाठी सर्वसमावेशक पंचसूत्री आराखडा जाहीर केला आहे. मुंबईत झालेल्या बैठकीत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी प्रशासन, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची जबाबदारी स्पष्ट करत तातडीने परिणामकारक बदल करण्याचे निर्देश दिले. उपाध्यक्ष डॉ. माधव कुसेकर यांच्यासह सर्व प्रादेशिक व्यवस्थापक व खातेप्रमुख या बैठकीला उपस्थित होते.

एसटीची वेळेवर धाव सुनिश्चित करण्यासाठी आगारस्तरावर सकाळी १० वाजता, विभागात ११ वाजता आणि प्रदेशात १२ वाजता दैनंदिन आढावा बैठक अनिवार्य करण्यात आली आहे. प्रवासी तक्रारी, नादुरुस्त वाहने, रद्द फेऱ्या आणि कर्मचारी गैरहजेरी यांची काटेकोर छाननी करून तत्काळ सुधारणा करण्याचा वक्तशीरपणाचा मंत्र देण्यात आला. संध्याकाळी ४ ते ६ दरम्यान पुढील दिवसाच्या वाहतूक आराखड्याचे नियोजन केले जाईल, ज्यामुळे बाजारपेठ, शालेय सहली किंवा आकस्मिक गर्दी-सर्व परिस्थितींना आगार सज्ज राहील.

लांब पल्ल्याच्या समांतर धावणाऱ्या बसेसवरील तक्रारींचा विचार करून सर्व वेळापत्रकांचे पुनर्मूल्यांकन सुरू केले असून मध्यवर्ती कार्यालयाने मंजूर केलेल्या फेऱ्याच राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. १ जानेवारीपासून स्थानकनिहाय नवे वेळापत्रक जाहीर केले जाईल. आरक्षणासाठी उपलब्ध बसांची संख्या वाढवणे, जादा फेऱ्यांची लवचिक उपलब्धता आणि 'दत्तक तत्त्वावर' फेऱ्यांची देखरेख अशी सुधारणा राबविण्यात येणार असून ऑनलाईन व ॲप-आरक्षणालाही मोठे प्रोत्साहन दिले जाणार आहे.

# काय करत आहे! झोपले का! घराच्या बाहेर या..

## बीजेपी पक्षाचे मध्यरात्री अंजनगाव शहरात पोचले बी फॉर्म

चेतन घोगरे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अंजनगाव सुर्जी**

सगळ्याकडे निवडणुकांचे वारे वाहत असताना अंजनगाव सुर्जी शहरात काल मध्यरात्री एका पक्षाचे बी फॉर्म आल्याने आज त्या पक्षाची चांगली चर्चा रंगली होती.




नगरपरिषद निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरण्याचा कालचा शेवटचा दिवस असल्याने पक्षाचा बी फार्म लावणे उमेदवारांना अनिवार्य होते काही पक्षांचे उमेदवारांनी आपल्या पक्षाचे बी फॉर्म लावून निवांत झोपी गेले होते पण राष्ट्रकूट पक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टीच्या पक्षाच्या उमेदवारांनी फॉर्म मात्र भरले पण पक्षाने उमेदवारांना बी फार्म दिले होते कारण पक्षाचे तिकीट व उभे राहण्याकरता त्या पक्षाचा बी फार्म असणे आवश्यक आहे. तसेच नगराध्यक्ष पदाच्या अविनाश गायगोले यांच्या नावाची घोषणा होऊन त्यांनी त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर बी फार्म सुद्धा लावला परंतु नगरसेवकाकडे उभे असलेल्या उमेदवारांना अजून पर्यंत बी फॉर्म मिळाले नव्हते..आज शेवटचा दिवस असल्याने रात्री बाराच्या नंतर ते सकाळी गार झोपेत असलेल्या भारतीय जनता पार्टीच्या नामांकन दाखल केलेल्या निवडक २८ उमेदवारांना मध्यरात्री अडीच ते तीनच्या दरम्यान फोन करून आम्ही तुमच्या घराच्या बाहेर उभे आहोत तुम्ही झोपले तर नाहीत ना दरवाजा उघडा या मग बाहेर असा मोबाईलवर संदेश देऊन उमेदवारांना घराच्या बाहेर बोलावण्यात आले व त्यांच्या हातात भारतीय जनता पार्टीचा बी फॉर्म देण्यात आला सदर उमेदवारांना बी फॉर्म हातात मिळतात आनंद गगनात मावसा झाला काहींची तर झोपच उडाली सकाळी नगरपरिषद प्रांगणात आपला उमेदवारी अर्ज आला बी फार्म लावण्याकरता आलेल्या उमेदवारांना नागरिक आनंदाने विचारत होते दरवाजा किती वाजता उघडला आणि बी फॉर्म किती वाजता मिळाला त्यामुळे अंजनगाव शहरात या विषयाची चांगली चर्चा रंगली होती.

**अमरावतीहून आली चार चाकी गाडी; शहरातील तीन नेते उपस्थित**

सदर उमेदवारांच्या घरी बी फार्म पोहोचवण्याकरता अमरावती वर्ण एक चार चाकी गाडी आली त्यामध्ये शहरातील भारतीय जनता पार्टीचे प्रमुख तीन नेते उपस्थित होते त्यांनी सदर बी फार्म वाटल्याची चर्चा रंगली. निष्ठावंतना डावल्याने त्यांनी घेतला दुसऱ्या पक्षाचा बी फॉर्म..मागील काही वर्षापासून पक्षाची एकनिष्ठ सेवा करणाऱ्या कार्यकर्त्यांची पक्षाने दखल न घेतल्याने ज्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता त्यांनी वेळेवर इतर पक्षाचा झेंडा हातात घेऊन त्या पक्षाचा बी फॉर्म लावला आता हे पदाधिकारी आपल्या पक्षासाठी किती निष्ठावंत राहतात हे पहावयास मिळेल.

# बंगल्यांचे वाटप निश्चित, रविभवनात मुख्यमंत्र्यांचे शिबिर कार्यालय

## १२ कॅबिनेट मंत्र्यांचे निवास नाग भवनात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नागपूर**

विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनासाठी रविभवन आणि नाग भवन येथे मंत्रिमंडळ सदस्यांना बंगल्यांचे वाटप अखेर निश्चित करण्यात आले आहे. वरिष्ठतेनुसार यादी तयार करून मंत्र्यांना निवासस्थान देण्यात आले. राज्याचे महसूल मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे मंत्र्यांमध्ये नंबर वन ठरले आहेत. दुसऱ्या क्रमांकावर अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, तर तिसऱ्या स्थानावर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आहेत.



विशेष म्हणजे कॅबिनेट मंत्र्यांना रविभवनात आणि राज्यमंत्र्यांना नाग भवनात निवास देण्याची परंपरा आहे. मात्र ८ डिसेंबरपासून सुरू होत असलेल्या हिवाळी अधिवेशनासाठी वाटपात अडचण निर्माण झाली होती. मंत्रिमंडळात ३६ कॅबिनेट मंत्री आणि ६ राज्यमंत्री आहेत. रविभवनामध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निवासस्थान (देवगिरी) यासह सुमारे ३० कॉटेज आहेत. यापैकी ६ कॉटेज विधानसभाध्यक्ष, उपाध्यक्ष, विधानपरिषद सभापती, उपसभापती आणि दोन्ही सभागृहांतील विरोधी पक्षनेते यांच्यासाठी आरक्षित असतात. मुख्यमंत्री यांचे शासकीय निवासस्थान रामगिरी, तर उपमुख्यमंत्र्यांचे निवास देवगिरी आणि विजयगड येथे असते. त्यामुळे रविभवनात उपलब्ध कॉटेजची संख्या २३ राहते. पण कॅबिनेट मंत्री ३६ असल्याने, काही कॅबिनेट मंत्र्यांना नाग भवनातही निवास द्यावा लागला आहे.

वाटप करण्यात आलेल्या यादीप्रमाणे, बावनकुळे यांच्या वर फक्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार आहेत. बावनकुळे यांच्या मागणीनुसार त्यांना रविभवनात कॉटेज क्रमांक ११ देण्यात आले आहे. भुजबळ यांना कॉटेज क्रमांक १, तर विखे पाटील यांना क्रमांक २ देण्यात आला आहे. कॉटेज क्रमांक ४ मध्ये मुख्यमंत्र्यांचेतात्पुरते (कॅम्प) कार्यालय असेल. विधानपरिषद सभापती राम शिंदे यांना क्रमांक १८, उपसभापती नीलम गोऱ्हे यांना क्रमांक २०, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना क्रमांक ९, तर उपाध्यक्ष अण्णा बंसोडे यांना क्रमांक १९ मिळाले आहेत. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांना कॅम्प प्रमुख म्हणून कॉटेज क्रमांक ६ देण्यात आले आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त 'नया अकोला' येथे भव्य अभिवादन सभा!

## माजी केंद्रीय मंत्री मुकुल वासनिक आणि खासदार प्रणिती शिंदे यांची प्रमुख उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त, शनिवार, दिनांक ६ डिसेंबर २०२५ रोजी अमरावती जिल्ह्यातील नया अकोला ( वलगाव - चांदूर बाजार रोड ) येथील त्यांच्या पवित्र अस्थी स्मारकाजवळ काँग्रेस पक्षाच्या वतीने भव्य अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे.माजी पालकमंत्री ड. यशोमती ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली या अभिवादन यात्रेचे गेली तीन वर्षे आयोजन करण्यात येत असून, यावर्षी सभेला माजी केंद्रीय मंत्री तथा राज्यसभा खासदार मुकुल वासनिक आणि सोलापूरच्या लोकसभा खासदार प्रणिती शिंदे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**कार्यक्रमाची मुख्य आकर्षणे**

प्रमुख अतिथी: माजी केंद्रीय मंत्री मुकुल वासनिक (राज्यसभा खासदार) आणि प्रणिती शिंदे (लोकसभा खासदार). उद्देश: डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र अस्थी स्मारकाचे जतन करणे आणि हा ऐतिहासिक ठेवा जनमानसांपर्यंत पोहोचवणे. पुस्तकांचे भव्य दालन: या कार्यक्रमाच्या निमित्ताने विविध प्रकाशन संस्थांची पुस्तकांची दालने





उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामुळे आंबेडकरी साहित्य आणि इतर महत्त्वपूर्ण पुस्तके सवलतीच्या दरात नागरिकांना उपलब्ध होतील.* मागील उपस्थिती: मागील वर्षांमध्ये माजी मंत्री बाळासाहेब थोरात, युवा नेते कन्हैया कुमार, ज्येष्ठ विचारवंत रावसाहेब कसबे आणि युवा आमदार प्रदीप ईश्वर यांनी या अभिवादन यात्रेत सहभाग घेतला होता.

अस्थी स्मारकाची महतीडॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी या पवित्र भूमीत आहेत, ही बाब गेली ६५ वर्षे म्हणावी तितकी प्रकाशात नव्हती. या अभिवादन यात्रेच्या आयोजनामुळे या ऐतिहासिक स्थळाचे महत्त्व आता मोठ्या प्रमाणात प्रकाशात आले आहे. दरवर्षी जिल्हाभरातून हजारो आंबेडकरी अनुयायी व नागरिक या ठिकाणी अभिवादन करण्यासाठी येतात.या अभिवादन यात्रेत जिल्ह्यातील प्रत्येक विहारात सक्रिय असलेले वंदना संघ, सामाजिक संघटना तसेच सर्व नागरिकांनी दिनांक ६ डिसेंबर २०२५ रोजी मोठ्या संख्येने सहभागी होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
विदर्भ प्रजासत्ताक
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत